

# मी माणसाप्रमाणे विचार करतो

# मी माणसाप्रमाणे विचार करतो

लेखक

एफ. टी. राईट

प्रकाशक:
**शब्बाथ-विश्रांति आगमन मंडळी**

मुद्रक व वितरक:
Sabbath Rest Advent Church,
Waldstrasse 37,
57520 Dickendorf,
Germany

पुस्तकाचे मूळ नांव:
I Think as a Man

पहिली आवृत्ति:
नोव्हेंबर १९९६

(I Think as a Man, Marathi edition)

अनुवादः
श्रीमती मीराबाई कंक,
ले-आऊट ४, प्लॉट ४२ अ-१,
बाबा जरग नगर,
पांचगांव रस्त्याजवळ,
कोल्हापूर - ४१६ ००७,
भारत

## मुखपृष्ठ चित्र

*मनुष्य नेहमीच त्याच्या जगाची व दुसऱ्याही जगांची गुपितें शोधण्याच्या प्रयत्नांत असतो. तो स्वतःला फार बुद्धिवंत व ज्ञानी समजत असतो. त्याला जें काही ज्ञान असते त्याच्या जोरावर त्याला असें वाटत असते कीं ज्या गोष्टींचा त्याने शोध लावलेला आहे व ज्या गोष्टींचा तो शोध लावण्याच्या प्रयत्नांत आहे, त्यांचा अर्थ तो बरोबर लावू शकतो. त्याला सर्व गोष्टी बरोबर समजतात असें त्याला त्याच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून दिसते आणि म्हणून माणसाप्रमाणेच विचार करण्याच्या बाबतीत तो समाधानी असतो.*

*परंतु ज्या साधनांद्वारें तो सर्व गोष्टींचा शोध घेऊं पाहत असतो, तीं कमकुंवत असतात, व म्हणून त्याला वाटते त्याहून त्याला बरेंच कमी ज्ञान असते. या मर्यादांमुळे जगिक गोष्टींचा त्याचा समज व त्यांचा त्याने लावलेला अर्थ बऱ्याच अंशीं चुकीचा असतो; परंतु एवढेच नाही, तर त्याच्या उत्पन्नकर्त्याच्या स्वभावासंबंधीचे त्याचे निष्कर्षसुद्धा चुकीचे असतात.*

*देवासंबंधीची चुकीची मते मनांत राहू नयेत म्हणून माणसाने माणसाप्रमाणे विचार करण्याचे सोडून देणे आवश्यक आहे; त्याने देवाप्रमाणे विचार करण्यास शिकण्याची गरज आहे. जेव्हा देवाचा प्रकाश मनुष्याच्या ज्ञानप्राप्तिचा मूलाधार बनेल, तेव्हाच मग त्याला देव खरोखरीं कसा आहे यासंबंधीचे बरोबर ज्ञान होईल.*

# थोडक्यांत

जगात पापाचा प्रवेश झाल्यापासून देवाच्या स्वभावाविषयींच्या मानवांच्या कल्पना दुर्दैवाने चुकीच्या होऊं लागल्या व त्यामुळे माणसाच्या आध्यात्मिक जीवनाची अवनति झाली आहे. देवासंबंधीच्या या चुकीच्या कल्पना काढून टाकण्याकरिता आपल्या विचारांना योग्य दिशा व चालना मिळावी हा या छोट्या पुस्तकाचा हेतु आहे.

हा विषय चांगल्या प्रकारें समजण्याकरिता अगदीच मूलभूत असलेली काही तत्वे या पुस्तकात दिली आहेत, परंतु जे अनेक प्रश्न वाचकांच्या मनांत येतील, त्या सर्वांची उत्तरें यांत देता येणे शक्य नाही. त्याकरिता *"तुमचा देव पाहा!"* (*Behold Your God*) नांवाचे दुसरें मोठे पुस्तक इंग्रजीतून प्रसिद्ध केलेले आहे. त्यांत तुमच्या अनेक प्रश्नांची उत्तरें सविस्तरपणे दिली आहेत. (हें पुस्तक आपण मिळविण्याचा पत्ता: The Sabbath Rest Advent Church, Waldstrasse 37, 57520 Dickendorf, Germany.)

देवाच्या स्वभावाची ओळख प्रभू येशूच्या जीवनचरित्रातून व शिकवणीतून होते, व तसें पाहूं गेल्यास संपूर्ण पवित्र शास्त्रातून (बायबलमधून) देवाचा स्वभाव प्रगट होतो, व म्हणून हा अभ्यास सर्वांत अधिक मोलाचा आहे. जर तो आपण अचूकपणे केला, तर त्यांत आपल्याला सार्वकालिक जीवनाची किल्ली सापडेल.

ही पाने वाचणाऱ्या प्रत्येक वाचकाला देवाच्या पवित्र आत्म्याद्वारें पातकी मानवाच्या नैसर्गिक विचारांपासून सुटका मिळो व देवाच्या वचनांनुसार विचार करण्यास शिकण्याचे वरदान मिळो अशी आमची प्रार्थना आहे.

# मी माणसाप्रमाणे

# विचार करतो

दिवसेंच्या दिवस पावसाचा मारा सतत व जोरदारपणे होत होता. तें जुने मातीचे धरण पस्तीस वर्षांपूर्वी बांधले गेले होते. उसळणारें गढूळ पाणी जवळजवळ त्याच्या काठापर्यंत आले होते. तरी पावसाची झोड चालूच होती.

खालच्या दरीच्या पसरट भागात वसाहत केलेले लोक रोजच्याप्रमाणे कामधंद्याला लागले. पाऊस बंद व्हावा अशी इच्छा त्यांनी बोलून दाखविली, परंतु त्यापलिकडे त्यांनी पावसाकडे विशेष लक्ष दिले नाही.

आणि मग ती दुर्घटना घडली.

पाण्याच्या अनेक टन वजनाच्या दाबाखाली मातीच्या भिंती थरथरल्या, त्यांना भेगा पडत गेल्या व सरतेशेवटीं बाहेरच्या बाजूला त्या कोसळल्या. गर्जणारा, फसफसणारा, अनियंत्रित पाण्याचा तीस फूटी लोंढा एक्स्प्रेस आगगाडीच्या वेगाने त्याच्या मार्गात जें काही येईल, तें गिळंकृत करीत गेला. जेव्हा त्याचा अल्पकालीन रूद्रावतार सरला, तेव्हा ३९ लोक मेल्याचे व ४५ जबर जखमी झाल्याचे आढळून आले. इमारती आणि गाड्यांचा चुराडा झाला होता.

विमा कंपन्यांनी या दुर्घटनेचे वर्णन “देवाची करणी” असें केले.

अर्थातच, कारण कीं ते माणसांप्रमाणे विचार करीत होते.

दक्षिण समुद्रात भयंकर उकाडा होणाऱ्या अरण्यमय बेटावर एका मोठ्या ज्वालामुखीने आपले मस्तक उंचावले. अलिकडेच त्याच्या तोंडातून गडगडाट व धूर बाहेर पडू लागला होता, व त्यामुळे खेडुत अधिकाधिक भयग्रस्त होऊं लागले होते. मग तो दिवस उजाडला जेव्हा मोठमोठ्या विस्फोटांनी गगनभेदी आवाज उमटले. ज्वालामुखी उकळता लाव्हारस ओकू लागला व त्याचा प्रवाह पायथ्याशी असलेल्या खेड्यांवरून गेला. घरे ज्वाळांत भस्म झाली, पिके उध्वस्त झाली, गुरांच्या प्राणहानीचे तर काही विचारायलाच नको. खेड्यांतील लोक जीव वाचविण्याकरिता पळून गेले व शेवटीं त्यांना होड्यांत बसून उष्ण समुद्रात शिरावे लागले.

भयग्रस्त चेहऱ्यांनी ते एकमेकांना गंभीरपणे म्हणूं लागले कीं देव त्यांच्यावर कोपला आहे व त्याचा क्रोध शमविण्याकरिता त्यांनी काहीतरी केलेच पाहिजे.

असा विचार करणे म्हणजे माणसासारखा विचार करणे आहे.

नेहमीच धडधाकट असलेला माणूस गंभीर रित्या आजारी पडतो. दवाखान्यात पडून दु:खवेदना भोगत असतांना समाधानाकरिता त्याचे विचार देवाकडे वळतात. बिछान्याशेजारीं मेजावर असलेले पवित्र शास्त्र तो उचलतो आणि आयुष्यात पहिल्याप्रथम तें उघडून वाचू लागतो. उत्पत्तितील आदामाच्या निर्मितीची व पतनाची नोंद वाचल्यावर वाचतवाचत तो महापूराच्या गोष्टीकडे येतो. तेथे तो वाचतो कीं जे कोणी देवाचे ऐकत नव्हते, त्यांना मारून टाकण्याकरिता देवाने पृथ्वीवर जलप्रलय पाठविला. मग तो सदोम आणि गमोरा ही शहरे अग्निने नष्ट केल्याचे वाचतो, इजिप्त देशाला पीडांनी नमविल्याचे वाचतो, आणि अमालेकी लोकांचा त्यांच्या निष्पाप बालकांसकट संहार करण्याची आज्ञा देवाने इस्राएली लोकांना दिल्याचे वाचतो. एवढे वाचूनच त्याला उबग येतो. तो पुस्तक बंद करून ठेवून देतो व म्हणतो कीं, ज्याप्रकारें देवाचे वर्णन त्या पुस्तकात त्याने वाचले आहे, तसल्या निर्दयी देवावर कोणीच

प्रेम करू शकणार नाही, कीं त्याची भक्ति मनापासून भक्तिभावाने करू शकणार नाही.

सर्वकाही त्याने मानवी दृष्टिकोनातून पाहिले ही किती दु:खाची गोष्ट आहे. मानव वागणूक करील तशी वागणूक देवाने केली असें त्याला दिसले.

हल्ली वरचेवर अधिकाधिक दुर्घटना सबंध जगभर प्राणहानी आणि वित्तहानी करतांना आढळून येताहेत. त्या "देवाची करणी" आहेत असेंच नेहमी मानले जाते – तो त्याचे आज्ञापालन न करणारांवर त्याचा कोप भडकवितो असें समजले जाते.

हा समज म्हणजे मानवी पद्धत व मानवी वागणूक देवाला बहाल करणे आहे.

असें बोलणे म्हणजे देव बोलतो तसें बोलणे नाही व देव विचार करतो तसा विचार करणेही नाही. जोवर माणूस मानवाच्या उथळ पद्धतिने देवाविषयीं विचार करील, तोवर कोणीही देवाची भक्ति व सेवा खऱ्या अंत:करणाने करणार नाही. मानवी जीवनाकडे दृष्टिक्षेप केल्यास वरील कथन सिद्ध होते. कोपायमान झालेला देव पृथ्वीवर भीषण संकटे पाठवीत असतो ही कल्पना मानवांच्या मनांत इतकी पक्की बसलेली आहे कीं तिच्या खरेखोटेपणाबद्दल त्यांच्या मनांत शंकासुद्धा येत नाहीत. त्यांच्या आज्ञाउल्लंघनामुळे, तसेंच त्यांना सुधरण्यासाठी म्हणून देव असें करतो असा त्यांचा समज असतो; पण देवाच्या तथाकथित करणीमुळे इच्छित परिणाम घडून येतांना काही आढळत नाही. उलट जितक्या जास्त असल्या "शिक्षा" माणसांना भोगाव्या लागतात, तितके ते देवाची कदर करीनासे होतात व अधिक बंडखोर बनून मनमानेल तसें वागतात.

हा मानवस्वभावानुसार घडून येणारा नेमका परिणाम आहे. जरा पाहा कीं पृथ्वीवरल्या कोठल्याही राजाधिराजाने त्याच्या प्रजेला आज्ञाउल्लंघनाकरिता कठोर शासन करून कधी त्यांचा आदरभाव व एकनिष्ठता मिळविली आहे काय? जास्तीत जास्त त्याने भीतियुक्त सेवा मिळविली असेल, परंतु ती भक्तिभावाची एकनिष्ठता नव्हे. तेव्हा, मानवांना वाटते तसा देव जर शासनाच्या

कठोर पद्धति वापरत असेल, तर त्याचे उद्दिष्ट कधीच सफळ होणार नाही. प्रीति व मनापासून आज्ञापालन यांच्याऐवजी त्याला गुलामांची "एकनिष्ठता" तेवढी मिळेल, व उघडउघड बंडातसुद्धा त्याची परिणति होऊं शकेल.

## विचार करण्याची निराळी पद्धत

देवासंबंधी विचार करण्याची एक दुसरी, अगदीच निराळी, अतिशय सुंदर व मनाला आल्हाद वाटेल अशी आगळी पद्धत आहे; ती पद्धत म्हणजे ख्रिस्ताची पद्धत होय. देवासंबंधी मानवाप्रमाणे नव्हे, तर ख्रिस्ताप्रमाणे, विचार करण्याचा कालसमय निश्चित आला आहे. जेव्हा माणसे देवाविषयीं ख्रिस्ताप्रमाणे विचार करायला शिकतील, तेव्हा मानवी हृदयांत देवाकरिता भक्तिभाव, प्रीति, हर्ष, आदर, एकनिष्ठता व आपलेपणा आपोआप निर्माण होईल. तेव्हा कुठे मग देवाला आपण वत्सल पिता असें म्हणू शकू, बळजबरी करणारा शासक असें समजणार नाही.

जेव्हा प्रभू येशू पृथ्वीवर अवतरला होता, तेव्हा त्याला कैक उद्दिष्टे साध्य करावयाची होती. त्यापैकी एक अति महान उद्दिष्ट त्याच्या पित्याच्या अद्भुत सुस्वभावासंबंधी जो खोटेपणा मानव-जगतात पसरविण्यात आला आहे, तो उघड करणे व पित्याचा खरा स्वभाव खरोखरीं कसा आहे तें दाखवून देणे हें होते. प्रभू येशू आपणां प्रत्येकाला पाचारण करतो, कीं आपण देव कसा आहे तें मानव-स्वभावानुसार पाहू नये, तर देवाचा स्वभाव त्याने स्वानुभवाने स्वतःच्या आयुष्याद्वारें प्रगट केला आहे तसा तो त्याच्या दृष्टिकोनातून पाहण्यास शिकावे.

प्रभू येशूने देवाचा स्वभाव जगापुढे इतक्या पूर्णपणे प्रगट केला आहे, कीं मानवाला देवासंबंधी जें काही कळू शकते व कळण्याची आवश्यकता आहे, तें सर्वकाही त्याला देवपुत्राच्या जीवनचरित्रातून व शिकवणीतून प्रगट होऊं शकते.

आणि तरीही, प्रभू येशूने पित्याला प्रगट करण्याचे हें कार्य अद्‌भुत रित्या पूर्णत्वाला नेऊनही, त्याच्या सेवेचा हा भाग लोकांच्या विशेष माहितीचा नाही, अद्यापही नाही. ख्रिस्ताच्या प्रेषितांनासुद्धा या सेवाकार्याची माहिती झाली नव्हती, आणि म्हणूनच फिलिपाने म्हटले होते:

"प्रभूजी, आम्हांला पिता दाखवा म्हणजे आम्हांला पुरे आहे."

या विनंतीने प्रभू येशूची फार निराशा झाली होती; आणि यांत काही नवल नव्हते, कारण कीं जे त्याच्या सर्वांत जवळचे होते, ज्यांना याबाबतीत सर्वप्रथम व सर्वधिक ज्ञान व्हायला पाहिजे होते, ते त्याबाबतीत अगदीच अजाण राहिले होते असें त्याला फिलिपाच्या प्रश्नातून उमगले.

"येशूने त्याला म्हटले, फिलिप्पा, मी इतका काळ तुम्हांजवळ असूनही तूं मला ओळखीत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे, त्याने पित्याला पाहिले आहे; तर आम्हांला पिता दाखवा असें तूं कसें म्हणतोस?" *योहान* १४:८,९.

प्रभू येशूने स्वमुखाने साक्ष दिली कीं जर शिष्यांनी त्याला पाहिले व त्याचा अद्‌भुत प्रेमळ स्वभाव ओळखला, तर त्यांनी पित्यालाच पाहिले आहे. म्हणजेच प्रभू येशू पित्याविषयीं केवळ तोंडच्या शब्दांनीच सांगायला आला होता असें नाही, तर पित्याचा स्वभाव प्रत्यक्ष प्रगट करायला, स्वतःच्या स्वभावाद्वारें दाखवून द्यायलासुद्धा आला होता असें म्हणण्यात काहीच वावगे नाही. या दोन्ही गोष्टी प्रभावीपणे होण्याकरिता प्रभू येशू स्वतःच स्वभावाच्या बाबतीत पित्याचा अगदी निष्कलंक व परिपूर्ण नमुना असणे आवश्यक होते. तो खरोखरीच तसा होता.

फिलिपासंगतीच्या या संभाषणाच्या बराच काळ अगोदर त्याने त्याच्या शिष्यांना सांगितले होते कीं, त्याच्या आयुष्यात पित्याचे जीवन तंतोतंत प्रतिबिम्बित होत होते, व पिता जें करीत असतो तेंच तो करीत होता.

"ह्यावरून येशूने त्यांना उत्तर दिले, मी तुम्हांला खचित खचित सांगतो, पुत्र पित्याला जें काही करतांना पाहतो त्यांवाचून काहीही त्याला स्वतःहून करता येत नाही; कारण जें काही तो करतो तें पुत्रही तसेंच करतो.

"कारण पिता पुत्रावर प्रीति करतो, आणि स्वतः जें काही करतो, तें सर्व त्याला दाखवितो. तुम्हांला आश्चर्य वाटावे म्हणून तो ह्यांहून मोठी कामे त्याला दाखवील." *योहान* ५:१९,२०.

"सत्य मीच आहे" (*योहान* १४:६) असें ज्याने म्हटले, त्याच्या या वरील कथनात महत्वाचा मुद्दा असा आहे कीं, पिता करीत असतो त्याच गोष्टी प्रभू येशू करीत होता; एवढेच नाही, तर त्या तो अगदी तशाच प्रकारें करीत होता; म्हणजे जसा देव करतो, अगदी त्या पद्धतिने करीत होता. त्या दोघांच्या कार्यपद्धति, कार्यपद्धतिंची तत्वे, कार्याच्या शैली अगदी त्याच आहेत, व एकाच्या आहेत अगदी पूर्णपणे तशाच दुसऱ्याच्या आहेत.

जुना करार वाचल्यावर अनेकांना जुन्या करारातील देव रागीट, सूड घेणारा देव दिसतो, ज्याला पश्चात्ताप न करणारांच्या असहाय्य डोक्यांवर उकळत्या अग्निज्वाळांचा वर्षाव करण्याचे काहीच वाटत नाही; उदाहरणार्थ, सदोमचे रहिवासी. मग प्रभू येशूचे जीवनचरित्र वाचल्यावर त्यांना जुन्या करारातील त्यांना दिसलेल्या देवापेक्षा प्रभू येशू अगदीच भिन्न दिसतो, आणि म्हणून देवाचा आणि प्रभू येशूचा स्वभाव निरनिराळा आहे असें ते समजतात. त्यांना प्रभू येशू सौम्य, ममताळू, दयाळू, क्षमाशील, नम्र, शांतचित्त, वैऱ्यांवर कधीही सूड न उगवणारा असा दिसतो. त्याच्या वैऱ्यांनी त्याला कमालीची पाशवी वागणूक दिली, क्रूरपणे अव्हेरले, दयामाया न दाखविता छळले, व निर्लज्जपणे त्याच्याविषयीं खोट्यानाट्या गोष्टी जनसमाजात पसरविल्या, तरी तो त्यांचे हितच करण्यास बघत होता. या दुष्टांना नष्ट करून टाकायला त्याच्यावर सैतानाने कितीतरी तीव्र मोह टाकले, तरी तसें करण्यास त्याने कधी बोटसुद्धा उचलले नाही.

पित्याचा आणि पुत्राचा स्वभाव निराळा आहे असें म्हणणे म्हणजे माणसाप्रमाणे बोलणे होय, ख्रिस्ताप्रमाणे नाही. त्याने अगदी ठामपणे व पूर्ण अधिकाराने जाहीर केले कीं पित्याचा आणि त्याचा स्वतःचा स्वभाव अगदी

सारखा आहे व ते दोघेही एकमेकांसारखीच कार्ये करतात, व तींसुद्धा अगदी एकाच सारख्या प्रकारें करतात.

## निराळा दृष्टिकोन

प्रभू येशूच्या दृष्टिकोनातून जे पाहतात व त्याच्याप्रमाणे विचार करतात, त्यांना सत्य माहीत होते व ते सत्य बोलू लागतात. ते मानवाप्रमाणे विचार करण्याचे सोडून देतात. प्रभू येशूच्या साक्षीशी जीं जीं मते व विचार जुळत नाहीत, तीं सर्व मते व विचार ते मनातून काढून टाकतात; म्हणजेच जुन्या करारात त्यांनी देवाला जसें पाहिले होते, तें देवाविषयींचे चुकीचे विचार त्यांना काढून टाकणे भाग पडते, व त्याऐवजी देवाच्या पुत्राने दिलेल्या देवस्वभावाच्या प्रगटीकरणानुसार देवाचा स्वभाव अगदी निराळ्या दृष्टिकोनातून पाहण्यास शिकावे लागते. खरे तर, देवाविषयींचा प्रत्येक विचार आपण प्रभू येशूच्या जीवनाशी व शिकवणीशी पडताळून पाहावयास पाहिजे. जो कोणता विचार प्रभू येशूच्या वागणुकीशी जुळत नाही, तो किती जरी सयुक्तिक वाटला किंवा कितीही दीर्घकालीन प्रथांचा त्याला आधार असला, तरी तो चुकीचा जाणून आपण रद्द करावयास पाहिजे. जरी त्या विचारात नेमके चुकीचे काय आहे तें आपल्या लक्षांत सुरूवातीला येत नसले, तरी आपण तसला विचारच मनांत बाळगता कामा नये. जे चुकीच्या विचारांना मनांत थारा देणार नाहीत, त्यांना लवकरच देवाच्या स्वभावाविषयींचे व देवाच्या पद्धतिंविषयींचे बरोबर ज्ञान खात्रीने होईल, व तें झाल्यास, मोजमाप होऊं शकणार नाही इतके फायदे व आशीर्वाद त्यांना लाभतील.

या लहानशा पुस्तिकेत जुन्या करारातील देवाच्या स्वभावासंबंधीच्या सर्वच चुकीच्या कल्पनांची चर्चा करता येणे शक्य नाही, परंतु एका प्रसंगाचे तरी आपण विश्लेषण करू या.

अनेक शतके इस्राएली लोक इजिप्तमध्ये गुलामगिरीत होते. शेवटीं जळत्या झुडपातून देवाने मोशेला दर्शन देऊन लोकांना वचनदत्त देशात घेऊन जाण्यास पाचारण केले. त्याला दिलेल्या सूचना अगदी स्पष्ट होत्या:

"त्यासमयीं परमेश्वराने मोशेला म्हटले, पाहा, तुला मी फारोचा देव करतो; आणि तुझा भाऊ अहरोन हा तुझा संदेष्टा होईल.

"जें काही मी तुला आज्ञा देऊन सांगतो तें सर्व तूं बोल; तुझा भाऊ अहरोन फारोला सांगेल कीं, तूं इस्राएल लोकांस तुझ्या देशातून जाऊं दे.

"मी फारोचे मन कठोर करीन आणि मिसर देशात माझी चिन्हे व अद्‌भुते विपुल दाखवीन.

"तरी फारो तुमचे काही ऐकणार नाही. मग मी मिसरावर आपला हात टाकीन आणि त्यांस मोठ्या शिक्षा करून मी माझ्या सेना, माझे लोक, इस्राएलवंशज यांस मिसर देशातून बाहेर काढीन.

"आणि मिसरावर मी आपला हात उभारून त्यांच्यामधून इस्राएल लोकांस बाहेर काढीन तेव्हा मिसरी लोकांस कळेल कीं, मी परमेश्वर आहे." *निर्गम* ७:१-५.

गोष्टीत पुढे मोशे आणि अहरोन राजापुढे जातात, इस्राएली लोकांच्या सुटकेची मागणी करतात, फारो ठामपणे नकार देतो व मग एकापाठोपाठ एक अशा भयंकर पीडा येतात, व शेवटीं आपला पराभव कबूल करून राजा त्यांना आनंदाने जाऊं देतो असें दिसते. हा इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे.

या सबंध नाट्यमय इतिहासात देव कसा वागला त्यासंबंधी लोकांच्या मनांत कैक चुकीच्या कल्पना आहेत. जे लोक मानवाप्रमाणे विचार करतात, त्यांचा या संपूर्ण कथेकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुढीलप्रमाणे असतो:

विश्वाचा सर्वसत्ताधारी चालक देव आहे. इस्राएली लोकांची सुटका करावयाची असा त्याने निर्णय घेतला तो काळ आला. त्यानुसार त्याने मोशेला हुकूम केला कीं त्याने अधिकारवाणीने राजाला लोकांना सोडायला सांगावे व त्याने नकार दिल्यास गंभीर परिणामांची धमकी द्यावी.

राजाने नकार दिला, व त्यावर देवाने नील नदीचे व देशभरच्या पिण्याच्या पाण्याचे किळसवाण्या रक्तात रूपांतर करून त्याला टोला दिला. मग उद्दाम राजाने नमावे म्हणून देव थोडा वेळ थांबला. जेव्हा त्याने देवाचा हुकूम मानण्यास पुन्हां नकार दिला, तेव्हा देवाने त्याला पुन्हां एकदा पहिल्यापेक्षा अधिक जोराचा टोला दिला. अशा प्रकारें प्रत्येक हटवादी नकारानंतर देव त्याला टोले देत गेला, इतके कीं शेवटीं त्याला नमावेच लागले व लोकांची सुटका करण्याशिवाय त्याच्यापुढे पर्यायच उरला नाही.

वरील परिस्थितीत देव अशा वरील प्रकारें वागला असें सर्वसाधारणपणे लोक समजतात.

आता देवाच्या वागण्याची ही पद्धत दुसऱ्या एका घटनेशी तुलना करून आपण पाहू या बरें.

जगाच्या काही मोठमोठ्या शहरांत, उदाहरणार्थ अमेरिकेतील शिकागो शहरात, अट्टल गुन्हेगारांच्या अशा काही संघटना आहेत कीं ज्या स्वत:ला शहराचे खरोखरीचे सूत्रधार समजतात. एखाद्या उद्योगपतिकडून ठराविक रक्कम मिळवायची असें ठरविल्यावर ते त्याच्याकडे जातात व पैशांची मागणी करतात. त्या भागात त्यांच्या सत्तेविरूद्ध कोणाची सत्ता चालत नाही हें ते स्पष्ट करतात व जर त्याने त्यांची मागणी मानली नाही तर त्याला ते शासनाची धमकी देतात. त्या उद्योगपतिला तत्वनिष्ठतेचे महत्व आहे म्हणून म्हणा, किंवा त्याला या गुंडांच्या सामर्थ्याची कल्पना नाही म्हणून म्हणा, तो नकार देतो. त्यावर ते त्याला जोराने गुद्दा मारतात, त्याच्या दुकानाची किंवा मोटारगाडीची तोडफोड करतात, किंवा याहून भयंकर दुसरे काही करतात. मग ते त्याला पुन्हां विचार करायला वेळ देतात. तो नकार देतच राहिला, तर ते त्याला तो कबूल होईपर्यंत पुन्हांपुन्हां मारत राहतात. शेवटीं तो निरूपाय म्हणून त्यांच्यापुढे नमतो. गुंडांना त्याच्यापासून जें पाहिजे असते तें मिळते व शिवाय स्वत:चे सामर्थ्य दाखविण्याचीही त्यांना संधि मिळालेली असते. या

माणसाच्या उदाहरणामुळे शहरातील दुसरे उद्योगपति धडा घेतील हें त्यांना ठाऊक असते.

कार्य साधावयाच्या या कुटिल कार्यपद्धति अगदीच प्रभावी होतांना दिसतात. परंतु गुंडांचे हुकूम मानले जातात तें काही त्यांच्याबद्दलच्या प्रेमामुळे किंवा आदरामुळे मानले जात नाहीत. उलट त्यांच्याविषयीं दुसऱ्यांच्या मनांत तिटकाराच असतो व त्यांच्या कार्यपद्धति तिरस्करणीय समजल्या जातात. त्यांचे आज्ञापालन केले जाते कारण कीं त्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो.

## अति महत्वाचा प्रश्न

आता हा प्रश्न उद्‌भवतो: अट्टल गुन्हेगारांच्या आणि इजिप्तमध्ये देव जसा वागला असें समजले जाते त्याच्या कार्यपद्धतिंमध्ये काय फरक आहे बरें? प्रश्न काय आहे तो नीट पाहा. प्रश्न कार्यपद्धतिंसंबंधी आहे. गुंड लोक ज्या कार्यपद्धति वापरतात व ज्या कार्यपद्धति देवाला बहाल केल्या जातात, त्या कार्यपद्धतिंसंबंधी प्रश्न आहे. गुंडांचे हेतु व देवाचे हेतु किंवा स्वभाव यासंबंधी नाही, तर त्यांच्या कार्यप्रणालीसंबंधी आहे.

उत्तर असेंच देणे भाग आहे की त्यांच्यात मुळींच कोठलाही फरक नाही. सर्वसामान्य माणसाची देवाच्या इजिप्तमधील वागणुकीसंबंधीची जी कल्पना आहे तिला आपण धरून राहिल्यास, देवाच्या पद्धति आणि जे लोक लूटमार व छळवाद करून जगतात त्यांच्या पद्धति अगदी सारख्याच आहेत असेंच म्हणावे लागेल.

जेव्हा मी हा निष्कर्ष एका चांगल्या शिकल्यासवरलेल्या गृहस्थापुढे मांडला होता, तेव्हा त्याने लागलीच प्रत्युत्तर केले होते कीं देवाच्या पद्धति गुंडांच्या पद्धतिंप्रमाणेच होत्या, परंतु देवाचा हेतु निराळा होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे

म्हणजे, गुंडगिरी करणारे स्वार्थ साधण्यासाठी या पद्धति अवलंबतात, तर देव दुसऱ्यांच्या हिताकरिता तसें करतो. एकूण हेतुमुळे साधनपद्धति योग्य ठरते असें म्हणणे आहे. गुन्हेगारांच्या पद्धतिंचा निषेध त्यांच्या स्वार्थी हेतुमुळे केला पाहिजे, परंतु देव सद्हेतुने त्याच पद्धति वापरतो, तेव्हा त्या योग्य ठरतात असें म्हणणे आहे.

परंतु शास्त्रवचनांत अशा युक्तिवादास मुळींच आधार नाही. देव स्वत: त्याचे मार्ग माणसांच्या मार्गांसारखेच आहेत हा विचार एकदम नाकबूल करतो.

हे पाहा त्याचे शब्द:

"कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हत; माझे मार्ग तुमचे मार्ग नव्हत, असें परमेश्वर म्हणतो.

"कारण आकाश जसें पृथ्वीहून उंच आहे, तसें माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत." *यशया* ५५:८,९.

वरील शास्त्रवचनांत देवाने जें काही म्हटले आहे तें पूर्ण सत्य आहे, परंतु मग अगोदर वर्णिलेला देवस्वभाव देवाचा असू शकत नाही. त्याने इजिप्तमध्ये जें केले असा आपला समज आहे, तो खरा असेल तर, देवाचे मार्ग नीचातल्या नीच लोकांच्या मार्गांपेक्षा मुळीच भिन्न नाहीत असें होईल, व त्याबाबत त्याने जें म्हटले आहे, तसें म्हणण्याद्वारें त्याने स्वत:ला लबाड ठरविले आहे असें होईल.

परंतु देव खोटेपणा करीत नसतो. तो सत्य आहे व केवळ सत्य तेंच सांगतो. म्हणून आपल्याला स्पष्ट होते कीं, इजिप्तमधील देवाच्या वागणुकीकडे दुसऱ्या अगदी निराळ्या दृष्टिकोनातून आपण पाहणे आवश्यक आहे.

जुन्या करारातील देवाच्या वचनांमुळे असा आपल्या विचारांत बदल करून आपली विचारसरणी आपण सुधारावी हें खरे आहे. परंतु एवढेच नाही. प्रभू येशूचे जीवनचरित्र – ज्यांत तो देव जसा वागतो तसाच वागला व देवाच्या कार्यपद्धतिंनुसारच तंतोतंत चालला – त्या जीवनचरित्रातूनही इजिप्तमधील देवाची वागणूक लोकांच्या मतें जशी होती असें मानले जाते, ती अगदीच चुकीची

धारणा असल्याचे दिसून येते. त्याच्या सबंध आयुष्यात प्रभू येशूने इच्छित हेतुपूर्तिकरिता एकदासुद्धा असें मार्ग अवलंबल्याचे आढळत नाही. आपल्या अद्भुत उद्धारकाने स्वमुखाने जाहीर केलेले आहे कीं, पिता जें करतो तेंच तो करतो, व पिता जसा कार्यसिद्धि करतो, अगदी तशाच प्रकारें तो कार्यसिद्धि करतो. जे लोक तरीही आपल्या पूर्वीच्या समजास धरून राहतात, कीं देवाने इजिप्तमध्ये हुकूमशहाप्रमाणे वागणूक केली व बळाच्या जोरावर त्याची उद्दिष्टे गाठली, त्यांनी त्यांच्या समजास पुष्टि मिळण्याकरिता प्रभू येशूच्या आयुष्यातून प्रभू येशूने त्या प्रकारें वागल्याचे एक तरी उदाहरण देणे आवश्यक आहे.

परंतु त्यांना तसें एकही स्पष्ट उदाहरण मिळणार नाही. कशातरी प्रकारें घोळ घालून प्रभू येशूने मंदिर शुद्ध केले ती घटना त्यांच्या समजास पुष्टि देते असें ते म्हणू शकतील. प्रभू येशूने चाबकाने सराफांना धमकाविले असें काही लोक म्हणतील, परंतु अशा प्रकारें बोलणे म्हणजे ख्रिस्तासारखे बोलणे नसून माणसासारखे बोलणे आहे हें मागाहून दाखवून देण्यात येईलच. जेव्हा देवाने इजिप्तमध्ये खरोखरीं काय केले तें स्पष्ट होईल, तेव्हा प्रभू येशूनेसुद्धा मंदिर शुद्ध करतांना खरोखरीं काय केले तें समजून येईल.

## प्रीतिच्या देणग्या

ज्याअर्थी प्रभू येशूच्या देवाच्या स्वभावासंबंधीच्या साक्षीने देवाने इजिप्तमध्ये काय केले याविषयींच्या लोकमताला दुजोरा मिळत नाही, आणि ज्याअर्थी देवाने स्वत: जाहीर केले आहे कीं त्याचे मार्ग माणसांचे मार्ग नव्हत, त्याअर्थी देवाच्या इजिप्तमधील कृतिकरिता पवित्र शास्त्राशी सुसंगत असेल व प्रभू येशूच्या कथनाशी पूर्णपणे जुळेल असा दुसरा दृष्टिकोन शोधला पाहिजे. हा दृष्टिकोन मानवाच्या विचारांनुसार नव्हे, तर ख्रिस्ताच्या विचारांनुसार असला पाहिजे.

सत्यवदनीं पवित्र शास्त्राची साक्ष आहे कीं: देव प्रीति आहे. *१योहान ४:८.* या वचनाचा पूर्ण जोर तेव्हा समजतो जेव्हा आपण बारकाईने नोंद घेतो कीं देव प्रेम करतो एवढेच हें शास्त्रवचन म्हणत नाही. तो प्रेम करतो ही गोष्ट खरी आहे, परंतु त्यापेक्षाही जास्त म्हणजे तोच प्रेम आहे. तो प्रीति असल्यामुळेच तो प्रेम करतो. देव अगम्य, असीम, अमर आणि अमर्यादित असल्यामुळे त्याच्या प्रेमाचे स्वरूपही असेंच आहे. तेंसुद्धा अगम्य, असीम आहे; म्हणजेच तें प्रेम कधी काळीं संपेल अशी सीमा किंवा मर्यादा त्या प्रेमाला नाही. म्हणूनच देवाविषयीं शास्त्रवचनांत असें लिहिले आहे कीं: तो जागा बदलणाऱ्या छायेसारखा बदलणारा नाही. *याकोब १:१७.*

मानवी प्रेम मर्यादित किंवा सीमित असते. जोवर आपल्यावर प्रेम केले जाते तोवर आपण प्रेम करतो, आणि मग आपले प्रेम घटत जाते. कधीकधी तर आपल्या प्रेमाच्या उत्कटतेचे रूपांतर तीव्र द्वेषात व तिटकाऱ्यात होते. याबाबतीतसुद्धा देवाचा स्वभाव मानवाच्या स्वभावाहून निराळा आहे. आपण कितीही जरी देवाला अव्हेरले, त्याला तुच्छ लेखले, त्याच्याशी भांडलो, त्याचा अपमान केला किंवा त्याच्यापासून वेगळे झालो, तरी त्याचे आपल्यावरील प्रेम तसूभरसुद्धा कमी होत नाही.

दैवी आणि मानवी प्रीतित एक मोठाच फरक असा आहे कीं आपण कसें आहोत त्यामुळे नव्हे, तर तो कसा आहे त्यामुळे देव प्रेम करतो; परंतु माणूस स्वत: कसा असतो त्यामुळे नव्हे, तर त्याच्या प्रेमाची व्यक्ति कशी असते त्यामुळे तो त्या व्यक्तिवर प्रेम करीत असतो. अशी विचारसरणी मानवांच्या मनांत अगदी बालपणापासून भिनविली जाते कीं, जर ते चांगले वागले तर आई किंवा बाबा त्यांच्यावर प्रेम करतील, परंतु जर ते खोडसाळपणे वागले तर आईवडिलांच्या प्रेमाला मुकतील.

मूल ही कल्पना चटकन आत्मसात करते व इतर मुलांशीच्या त्याच्या संबंधात त्यानुसार वागू लागते. जर दुसरे एखादे विशिष्ट मूल त्याच्या इच्छेनुसार व

विचारांनुसार वागले तर त्यांची मैत्री होते, परंतु जर तें या मुलाच्या मनाविरूद्ध वागू लागले तर मैत्री त्वरीत तुटते. दुसरी व्यक्ति कितपत प्रेम करण्याजोगी आहे त्यानुसारच या जगात एखाद्यावर प्रेम केले जाते. दुसरा माणूस कसाही असला व कसाही वागला तरी आपण त्याच्यावर प्रेम करू अशा पात्रतेनुसार आपण प्रेम करीत नाही.

हीच वृत्ति व हाच दृष्टिकोन बालक प्रौढ झाल्यावर व विवाहबंधनात शिरतांना ठेवते. ज्यांच्यावर तो प्रेम करू शकेल अशा त्याच्या आवडीच्या स्वभावाचे लोक शोधून काढून तो त्यांच्याशी मैत्रीसंबंध स्थापतो, परंतु इतरांपासून स्वत:ला अलिप्त ठेवतो. जर मित्रांचा स्वभाव बदलला व आपल्या गरजा किंवा इच्छा मित्रांकडून पुऱ्या होईनाशा झाल्या, तर मैत्री संपुष्टात येते.

देवाची पारख स्वत:च्या अनुभवांनी करण्याची माणसांची प्रवृत्ति असते, आणि म्हणून ते त्याला त्यांच्यासारख्याच स्वभावाचा समजतात. (*स्तोत्र* ५०:२१ पहा.) जोवर आपण आनंदाने त्याचे प्रत्येक बाबतीत ऐकतो व काटेकोरपणे त्याचे आज्ञापालन करतो, तोवर तो आपल्यावर प्रेम करतो असें समजले जाते. परंतु सत्यस्थिती अशी आहे कीं, आपण कितीही जरी त्याचे आज्ञाउल्लंघन केले आणि वाईट वागलो, तरी त्यामुळे त्याच्या आपल्यावरील प्रेमात काहीसुद्धा बदल होत नाही. अर्थात् त्या प्रेमाचा आपल्याला लाभ होण्यात निश्चित फरक होतो, कारण कीं आज्ञाउल्लंघनाचे स्वरूपच असें आहे कीं त्यामुळे आपण देवापासून दुरावले जातो. परंतु आपण देवापासून दुरावले जाणे म्हणजे देवाने त्याचे प्रेम काढून घेणे नव्हे.

मूर्तिमंत प्रेम म्हणजे मूर्त नि:स्वार्थीपणा व मूर्तिमंत स्वार्थत्याग होय. तें प्रेम केवळ दुसऱ्यांचाच विचार करते. म्हणूनच जेव्हा देवाने आकाशें व पृथ्वी उत्पन्न केली, तेव्हा त्याने तीं स्वत:करिता उत्पन्न केली नाही. त्याने निर्मिलेल्या प्राणीमात्रांकरिता त्याने तीं उत्पन्न केली. तें निर्मितीकार्य त्याने तुमच्याकरिता, माझ्याकरिता व जगांत ज्या कोणत्या व्यक्तिने जन्म घेतला त्या प्रत्येक

व्यक्तिकरिता केले. तेव्हा विचार करा बरें कीं जेव्हा देवाने सर्व सजीव जीवांना अस्तित्वात आणायचे ठरविले, तेव्हा किती विविध प्रकारच्या गरजा उद्भवल्या असतील!

जेव्हा देवाने मानवी कुटुंबाला जीवन ही प्रेमाची देणगी देण्याची योजना केली, तेव्हा तेवढेच पुरेसे होणार नाही हें त्याने ओळखले. कल्पना करा कीं, आपल्याला फक्त आयुष्य दिले गेले असते, परंतु वसतिस्थान दिले गेले नसते, तर शून्यातून, काळोख्या अवकाशातून आपल्याला युगानुयुगें सर्वकाळ तरंगत भटकावे लागले असते – पाहायला काही नाही, सहवास कोणाचा नाही, करायला काही नाही, अशी परिस्थिती असती. अशा आयुष्यापेक्षा अस्तित्वच नसणे अधिक बरें नाही काय? असें जीवन म्हणजे सर्वांत वाईट प्रकारचा जिवंत मृत्युच असता.

म्हणूनच देवाने त्याच्या अपार प्रीतिद्वारें व सुज्ञतेद्वारें मानवाला त्याच्या प्रेमाची भेंट म्हणून त्याच्याकरिता सर्वप्रथम परिपूर्ण वसतिस्थान उत्पन्न करायचे ठरविले. निर्मिती-आठवड्याच्या त्या पहिल्या दिवसांत त्याने तसें केले. परंतु हेंसुद्धा पुरेसे नव्हते, कारण कीं प्रगतिकरिता व यशप्राप्तिकरिता आवश्यक असलेल्या शक्ति व विविध पात्रता उत्पन्न केल्याशिवाय पृथ्वीवरील वास्तव्यात मानवाला पराकोटीचा आनंद व समाधान मिळू शकले नसते. या शक्ति दोन प्रकारच्या आहेत – मानवाच्या बाह्य जगतातील शक्ति आणि त्याच्या अंगीं असलेली पात्रता. त्यांची लांबच लांब यादी देण्याची इथे गरज नाही. थोडक्या उदाहरणांनी आपल्याला ही गोष्ट कळू शकेल.

मानवात शारीरिक, स्नायुसंबंधित, बौद्धिक, आणि आध्यात्मिक शक्ति व पात्रता असतात. मानवाच्या बाह्य जगतात निसर्गाच्या बलाढ्य शक्ति आहेत; उदाहरणार्थ: वीज, सूर्य, गुरूत्वाकर्षण, आणि आणखी हजारों. शक्ति उत्पन्न करण्याचे ठरविल्यावर एक समस्या उद्भवली. जरी विविध शक्तिंची निर्मिती मानवाच्या सुखाकरिता व मानवाला आशीर्वाद व्हावी म्हणूनच केली होती, तरी

त्यांच्या निर्माणाने त्या भयंकर विनाशाची साधने होऊं शकतील असाही धोका उत्पन्न झाला. शक्तिसामर्थ्याचे स्वरूपच मुळीं असें असते. त्याच्यात आशीर्वादित करण्याची किंवा विनाश करण्याची पात्रता असल्यावाचून त्याचे अस्तित्वच मुळीं राहू शकत नाही. हें सत्य रोजच्या आयुष्यातून आपल्या प्रत्ययाला येतच असते.

अगम्य सुज्ञता समस्येकडे डोळेझाक करू शकत नव्हती, आणि असीम प्रेम समस्या सोडविल्याशिवाय राहणार नव्हते. मानव आपोआप योग्य मार्गाचीच निवड करील अशा प्रकारें मानवी मन घडवावे हा एक उपाय देवापुढे होता. जर हाच उपाय देवाच्या मनाला सर्वोत्कृष्ट वाटला असता, तर देवाने मानवाला निश्चित तसेंच घडविले असते. परंतु शक्तिंचा दुरूपयोग होऊं नये म्हणून जर देवाने हा मार्ग स्वीकारला असता, तर मानवामध्ये निर्णय घेण्याची पात्रता नसती – म्हणजेच त्याच्यामध्ये विचार-पात्रता नसती. त्यामुळे माणसाला इच्छाआकांक्षांच्या पूर्तिचे उच्चतम स्तर गाठता आले नसते. चतुष्पाद प्राण्यांहून खालची पातळी माणसाची राहिली असती.

ही समस्या सोडविण्याकरिता काय उपाय करावे असें जर देवाने मानवाला विचारले असते, तर खात्रीने मानवाने हा उपाय निवडला नसता. आज, गुलामगिरीत राहण्यापेक्षा माणसे मरण पसंत करतात. अनेक संघटनांचे ब्रीद स्वातंत्र्य किंवा मरण असें आहे.

प्रबळ शक्तिंच्या घातक वापरापासून मानवाचे संरक्षण होऊं शकेल आणि तरी मानवाचे विचारस्वातंत्र्य व निर्णयस्वातंत्र्य हिरावले जाणार नाही अशा प्रकारचा उपाय शोधण्याचे अगत्य होते. म्हणून देवाला परिपूर्ण, निर्दोष नियमांनी मानवाचे शारीरिक, मानसिक, नैतिक, भौतिक, शास्त्रीय आणि आध्यात्मिक जीवन अगदीच पूर्णपणे नियंत्रित करणे भाग पडले. आपल्या प्रथमपूर्वजांमध्ये किंवा त्यांच्या कोणत्याही वंशजांमध्ये मानवाची गरज भागविण्याकरिता या समस्येवर उपाय करण्याचे सामर्थ्य नव्हते कीं शहाणपण नव्हते. परंतु देवामध्ये

तें अर्थातच होते. त्याच्या अपरिमित सुबुद्ध मनाद्वारें व प्रीतिमुळे त्याच्या प्रजेला तंतोतंत लागू होतील असें नियम मानवाकरिता एक परिपूर्ण, पूर्णपणे निर्दोष व आशीर्वादित देणगी म्हणून देण्यात देवाला हर्ष वाटला.

देवाचे नियम मानवाला आशीर्वाद ठरावे म्हणून देवाने नियोजिलेले आहेत, आणि तरीही मानवाला तें केवळ अंशत:च तसें दिसतात ही अति खेदाची व फारच गंभीर परिणामकारक गोष्ट आहे. ज्या आज्ञा मानवाने इतर मानवांशी व देवाशी कसा संबंध ठेवावा याविषयींच्या आहेत, त्या देवाने स्वत:चे महत्व वाढवावे म्हणून दिल्या आहेत असें बहुतेक लोकांना वाटते. हा विचार सत्याच्या अगदीच विरूद्ध आहे, व तो बाळगल्यामुळे देवाने निर्मिलेल्या त्याच्या प्रजेचे अमाप नुकसान होते. जोवर आपण मनात देवाविषयीं असें विचार बाळगू, मग तें सत्याच्या अज्ञानामुळे म्हणा किंवा ज्ञानप्रकाशास हट्टाने प्रतिकार करीत राहिल्याने म्हणा, तोवर देवाचा खरा स्वभाव आपल्याला समजू शकणार नाही व त्याच्याशी खऱ्या अर्थी आपले प्रीतिसंबंध राहणार नाहीत. म्हणूनच, जर देवाचा मानवाच्या परिपूर्ण सुखासमाधानाकरिता असलेला मूळ हेतु साध्य व्हावयाचा असेल, तर प्रथम देवासंबंधीच्या या चुकीच्या कल्पना मानवाने मनातून काढून टाकून बरोबर विचार मनांत रुजविण्याची आवश्यकता आहे.

मानवाच्या मनातील कल्पनांमध्ये बहुधा सत्य गोष्टी आणि चुकीच्या गोष्टी यांचे अजब मिश्रण आढळते. नैसर्गिक गोष्टींच्या बाबतीत, आणि विशेषत: शास्त्रीय प्रयोगांच्या बाबतीत, माणूस आपखुशीने देवाचे निसर्गनियम मानतो व त्यानुसारच कृति करू पाहतो. तऱ्हेतऱ्हेची विश्वविद्यालये, विविध देशांची शासकीय व्यवस्थापने व उद्योगप्रिय संस्था विश्वातील निसर्गशक्तिंना ज्या नियमांचे बंधन आहे तें नियम अधिक चांगल्या प्रकारें माहीत व्हावेत व त्यांतून जास्तीत जास्त फायदा मिळविता यावा म्हणून दरवर्षी संशोधनाकरिता लाखों डॉलर्स खर्च करतात. शिकाऊ विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या धंद्याला लागू असलेले निसर्गनियम काटेकोरपणे पाळले जाण्याचे महत्व घोटून घोटून

शिकविले जाते. उदाहरणार्थ: विमान चालविणाऱ्या वैमानिकाला किती असंख्य बंधने मानावी लागतात याचा विचार करा बरें. तो तीं पाळण्यात थोडा जरी चुकला, तर त्याच्यावर शिस्तभंगाकरिता कारवाई केली जाते किंवा त्याला नोकरीवरून तडकाफडकी हटविलेसुद्धा जाते. विमान-वाहतुक कंपन्या इतक्या कडकपणे त्यांचे व्यवहार करतात, कारण कीं त्यांना चांगलेच माहीत असते कीं निसर्गनियमांचे पालन केल्यासच जीवाचे रक्षण होऊं शकते; ही गोष्ट पक्की माहीत असल्यामुळे त्याबद्दल कोणी वाद घालत नाही.

शास्त्रीय क्षेत्रात निसर्गनियमांचे अनमोल महत्व जरी ओळखले जाते, तरी दुर्दैवाने या नियमांचा जीवनदायीं परमेश्वराशी काय संबंध आहे तें ओळखले जात नाही. हें नियम शून्यातून उत्क्रांति होऊन उत्पन्न झाले आहेत व त्यांना आपल्या कामीं वळवून आपल्याला राहणीचे उच्चतम स्तर गाठता येईल, तसेंच शत्रुंच्या मनांत धाक उत्पन्न करण्याइतपत बळ मिळविता येईल असें माणूस समजतो. या चुकीच्या समजामुळे त्यांची कल्पनेपलिकडे हानी होते, कारण कीं देव फक्त जीवनदाताच आहे असें नाही, तर तोच त्याच्या भक्तांना या सर्व गोष्टींचे सखोल व अफाट ज्ञान देणारा गुरूसुद्धा आहे. "परमेश्वराचे भय ज्ञानाचा आरंभ होय." *नीतिसूत्रे* ९:१०. त्याचे ज्ञान व सुज्ञता अपार आहे व जे कोणी त्याच्या सूचना मानतील, त्या सर्वांना तो ह्या देणग्या देण्यास तयार व उत्सुक आहे. जर मानवजातिने केवळ स्वत:च्याच शक्ति पणाला लावून जास्तीत जास्त ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी देवापासून शिकण्याचे ठरविले असते, तर सध्या आपल्याला आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी आपल्याला सर्व बाबतींतील सखोल ज्ञान प्राप्त झाले असते.

परंतु, जेव्हा नैतिक नियमांचा प्रश्न येतो, तेव्हा मानवाची वृत्ति फारच उदासीन आढळते. दुसऱ्यांवर जीं बंधने घालण्यास माणूस अगदीच तयार असतो, तींच बंधने स्वत:वर घालून घेण्यास तो मुळींच तयार नसतो. आपल्या कृतिंद्वारें माणसे दाखवून देतात कीं, दुसऱ्या माणसांपासून त्यांचे रक्षण होईल असें कायदे त्यांना

हवे आहेत, पण दुसऱ्या लोकांना त्यांच्यापासून रक्षण मिळेल असें कायदे त्यांना नकोत. परंतु नियमांची (आज्ञांची) योजनाच मुळीं देवाने अशा प्रकारें केलेली आहे कीं प्रत्येकाला त्यांचे नि:पक्षपाती व संपूर्ण संरक्षण मिळावे. देवाचे कायदे एकाचा गैरफायदा व दुसऱ्याच्या बाबतीत पक्षपात अशा प्रकारचे नाहीत. देवाने एकही आज्ञा स्वत:च्या मानाकरिता, स्वत:च्या फायद्याकरिता किंवा स्वार्थाकरिता केलेली नाही. काही लोकांचा या कथनावर एखादे वेळीं विश्वास बसणार नाही, परंतु हें कथन सत्य आहे. "जितकी जास्त सत्ता हातीं, तितके दुसऱ्यांच्या जीवावर स्वत: मौज करण्याची संधि अधिक" या तत्वानुसार मानवी मन चालते. म्हणून, ज्याअर्थी देव सर्वसत्ताधारी आहे, त्याअर्थी तोसुद्धा स्वत:ची मानमरातब वाढविण्याकरिता व स्वत:च्या महत्वाकांक्षा पूर्ण करण्याकरिता त्याची सत्ता वापरतो असा निष्कर्ष काढला जातो.

पण देव काही माणूस नाही. पृथ्वीवरील जनसमाज त्याच्या विचारांपासून व त्याच्या रीतिंपासून दूर बहकला आहे. देवाचे मार्ग मानवाच्या मार्गांच्या अगदी उलट आहेत.

पहिली आज्ञा विचारात घ्या पाहू. "माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत." देवाचे स्थान राखले जावे व जी भक्ति व मान त्याला मिळण्यास तो पात्र आहे असें त्याचे मत आहे, ती भक्ति व मान त्याला मिळावा याकरिता देवाने ही आज्ञा अशा प्रकारें दिली आहे असा या आज्ञेचा अर्थ आपण किती सहजगत्या लावतो. ही आज्ञा मानवाच्या नव्हे, तर देवाच्या हिताकरिता दिली गेली आहे असें आपण समजतो.

परंतु खरी गोष्ट अशी नाही. देवाने निर्माण केलेल्या निर्मितीच्या हिताकरिताच मात्र ही आज्ञा दिलेली आहे. देवाला तिची गरज नाही, आणि स्वार्थत्यागी प्रेम स्वत:चे स्थान राखण्याचा विचारसुद्धा करीत नसते. ही आज्ञा आपण सतत मनात ठेवणे आपल्याकरिता किती आवश्यक आहे हें आपण थोडा विचार केला, तर आपल्या चटकन लक्षांत येईल.

देव विश्वाचा आणि पृथ्वीचा उत्पन्नकर्ता आहे. परंतु एवढेच नाही. क्षणोक्षणीं तो स्वतः अवकाशातील सर्व तेजस्वी तारांगणांना आणि शक्तिंना मार्गदर्शन करतो व योग्य पथांत ठेवतो. त्यांना आवश्यक असलेले सर्व सामर्थ्य तो त्यांना क्षणाक्षणाला पुरवीत असतो. एकटा तोच हें कार्य करू शकतो. जर देवाची जागा दुसऱ्या कोणीही क्षणभर जरी घेतली, तर जीवन व शक्ति यांच्या पुरवठ्यात खंड पडेल, व सगळ्यांचा तत्क्षणीं विनाश होईल.

उदाहरणादाखल सूर्याची गोष्ट घेऊं या. सूर्य एक प्रचंड शक्तिचा गोळा आहे, परंतु ही शक्ति देवाला त्याला अखंडपणे पुरवावी लागते, कारण कीं सूर्यामध्ये स्वतःची शक्ति कायम ठेवण्याची कोठलीही पात्रता नाही. जर सूर्याचे कार्य व्यवस्थितपणे झाले नाही, तर या पृथ्वीवरील सर्व जीवन संपुष्टात येईल. म्हणून, सूर्यावरील देवाचे नियंत्रण दूर होईल अशा प्रकारें देवाला त्याच्या स्थानावरून हटविले न जाणे अतिशयित महत्वाचे आहे. पण कोणी आक्षेप घेईल कीं देवाला स्थानबद्ध करण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये नाही. अर्थात्, शारीरिक दृष्ट्या तसें करण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये नाही ही गोष्ट खरी आहे, परंतु देवाला त्याच्या स्थानावरून दुसऱ्या एका प्रकारें मानव हटवू शकतो, कारण कीं जेथे देवाचे सान्निध्य कोणाला नको असेल, तेथे हजर राहण्याची बळजबरी देव कदापि करीत नाही; त्याचा स्वभावच तसा नाही.

जेव्हा माणसे त्यांच्या हट्टी बंडखोर कृतिंनी त्यांना देवाची गरज वाटत नाही असें दाखवून देतात व त्याद्वारें म्हणतात कीं देवाने त्यांना त्यांच्या आयुष्याची जबाबदारी स्वतःवर घेऊं द्यावी, तेव्हा देव त्यांच्याशी वाद घालत नाही. त्यांच्या मागण्या तो मान्य करतो व त्यांच्या विनंतीनुसार त्यांना सोडून जातो. मग देवाचे प्रेम व दया अस्वीकृत केलेल्या लोकांना आढळून येते कीं, देवाचे नियंत्रण दूर झालेल्या शक्तिंच्या ते बरोबर मध्ये सापडले आहेत.

एकट्या सूर्याच्या बाबतीत असें घडले तर काय होईल याचा विचार करू या बरें. नेमके काय होईल तें आपल्याला माहीत नाही, परंतु ज्या कोणत्या

परिणामांची आपण कल्पना करू शकतो त्यापैकीं कोणतीही आपल्या अस्तित्वाकरिता हितकारक ठरेल असें आढळून येत नाही. एकतर सूर्याची उष्णता हळूहळू नष्ट होईल, किंवा त्याचा एकदमच स्फोट होईल; तो त्याच्या भ्रमणमार्गातून बहकून अवकाशात दूरवर कोठेतरी जाईल, किंवा कोसळून पृथ्वीवर आदळेल. काही जरी झाले तरी त्यामुळे पृथ्वीवर कसल्याही प्रकारचे जीवन अस्तित्वात राहू शकणार नाही.

सबंध जगातील एकूण एक मानवाने देवाविरूद्ध असें बंड केल्याचा प्रसंग आजवर आलेला नाही. काही विशिष्ट भूभागातील रहिवाशांच्या बाबतीत असें घडलेले आहे; उदाहरणार्थ, सदोम व गमोरा हीं शहरें. तीच परिस्थिती बंडखोर इजिप्तमध्येसुद्धा उद्‌भवली होती.

## मोशेची काठी

योसेफाच्या आयुष्याद्वारें देवाची प्रीति व सामर्थ्य इजिप्तच्या लोकांच्या उद्धाराकरिता कसें कार्य करीत होते हें पाहण्याकरिता त्या लोकांचे डोळे उघडले गेले होते. इजिप्तच्या बलाढ्य राजाने त्या तरूण देवभक्ताकडून मिळालेल्या देवाच्या सूचना मानल्या, व त्यामुळे इजिप्त देश जगातील सर्वांत शक्तिशाली देश बनला. परंतु भरभराटीसोबत भ्रष्टाचार आला, व लवकरच इजिप्शियन लोक देवाला विसरून गेले. वर्षांमागून वर्षे गेली, परंतु देवाच्या त्यांची प्रेमपूर्वक काळजी वाहण्याचा काही फायदा झाला नाही. तें राष्ट्र देवापासून जास्त जास्त बहकत गेले. देवाला ते पूर्णपणे अव्हेरतील व त्यांच्याभोवतालच्या बलाढ्य निसर्गशक्तिंवरील नियंत्रण काढून घेण्यास ते देवाला भाग पाडतील तो काळ जवळजवळ येत गेला. मग त्यांचा विनाश पक्का झाला. परंतु असीम प्रेम करणारा देव राजाला प्रथम त्याबद्दलचा स्पष्ट इषारा दिल्यावाचून राहील हें

शक्यच नव्हते. म्हणून येणाऱ्या परिस्थितीचे स्वरूप राजाला कळेल अशा प्रकारें स्पष्टपणे दाखवून देण्याकरिता देवाने त्याच्याकडे मोशेला काठी घेऊन धाडले.

मोशे फारो राजापुढे देवाचा प्रतिनिधी म्हणून उभा राहिला. देवाने त्याला जें काही सांगितले अगदी त्याबरहुकूम त्याने केले, व म्हणूनच देव मोशेतर्फे राजाला इजिप्तमध्ये लवकरच काय होणार त्याचे तंतोतंत चित्र देऊं शकला.

देवाने निसर्गात व मानवात घातलेल्या शक्तिंचे चिन्ह म्हणून मोशेच्या हातात काठी होती. जसा मोशे काठी हातात धरून तिने कसें वागावयाचे त्यावर नियंत्रण करीत होता, त्याप्रमाणे त्या विविध शक्ति देवाच्या हातीं होत्या व देव त्यांच्यावर नियंत्रण ठेवीत होता. जेव्हा काठी संदेष्ट्याच्या हातून सुटली, तेव्हा तिचे सापात रूपांतर झाले. साप सैतानाचे चिन्ह आहे हें सर्वांना माहीत आहे. देव नव्हे, तर सैतान नाश करणारा, नासधूस करण्यात आनंद मानणारा विध्वंसक आहे.

मोशेचे पहिले पाऊल त्या उद्दाम राजाला त्याने इस्राएली लोकांना गुलामगिरीतून मुक्त करावे असें सांगणे होते. त्याने पश्चात्ताप करून देवाचे आज्ञापालन करण्याकरिता देवाने प्रेमाने दिलेले हें निमंत्रण होते. जें संकट त्वरेने येऊं पाहत होते, तें टाळण्याकरिता तातडीने घ्यावयाची हीच उपाययोजना आहे असें त्याला सांगण्यात आले. देवाचे निमंत्रण जर त्याने अव्हेरले तर त्याच्यावर व त्याच्या लोकांवर भयंकर संकटे कोसळू लागतील, इतकी कीं सरतेशेवटीं इस्राएली लोकांना गुलामगिरीत डांबून ठेवण्याचे त्यांचे सामर्थ्यच नष्ट होईल याची त्याला पूर्ण कल्पना देण्यात आली.

इजिप्तच्या लोकांचे तारण व इस्राएली लोकांची मुक्तता हें देवाचे दुहेरी कार्य यशस्वी होण्याकरिता देव खरोखरीं काय करील ह्याचे अगदीच स्पष्ट स्वरूप राजाला कळणे आवश्यक होते. जीं काही संकटे त्याच्यावर ओढवतील तीं देवाच्या हातून आलेली नसतील, तर जीवनरक्षण करणारे नियम झुगारून दिल्याचे ते नेमके व अटळ परिणाम असतील हें राजाला कळणे आवश्यक होते. राजाला हें शिकविण्यासाठी काठी आणि साप यांचा दाखला नाट्यरूपाने

दाखविला गेला. त्यातील संदेश अचूकपणे समजण्यावर व त्यानुसार वागणुकीत त्याने बदल करण्यावर सर्वकाही अवलंबून होते. त्याचप्रमाणे आजसुद्धा, राजाला देवाने जें काही दाखवून दिले तो संदेश आपण बिनचूकपणे समजण्यावर व त्यानुसार कृति करण्यावर आपल्याकरिता सर्वकाही अवलंबून आहे.

धडा जितका सोपा, तितकाच स्पष्ट आहे. जोवर काठी मोशेच्या हातात राहत होती, तोवर तिचे जहाल विषारी सापात रूपांतर होऊं शकत नव्हते. सापात रूपांतर होण्याकरिता ती त्याच्या हातातून विलग होणे व त्याच्या नियंत्रणाखालून निघणे आवश्यक होते. जोवर ती त्याच्या हातात व त्याच्या नियंत्रणाखाली नव्हती, तो सर्व काळ ती सापच राहिली, परंतु ज्या क्षणीं त्याने तिला परत हातात घेतले त्या क्षणीं ती पुन्हां काठी बनली.

यापेक्षा अधिक स्पष्टपणे देवाचा संदेश सांगता येणे शक्य होते कां? मुळींच नाही. दुर्दैवाने राजाने तो संदेश मानला नाही; परंतु तुम्ही आणि मी तसें करण्याचे काहीच प्रयोजन नाही. राजाला देव जें काही सांगत होता, तें शब्दांत पुढीलप्रमाणे मांडता येईल:

“हे फारो राजा, इजिप्तच्या महान सम्राटा,” देव म्हणाला, “आतापर्यंत तुझी व तुझ्या प्रजेची माझ्याविरूद्धची बढाईखोर बंडखोरी सहन करूनसुद्धा सामर्थ्याचा राजदंड मी माझ्या हातीं व माझ्या नियंत्रणाखाली ठेवला आहे; आणि म्हणूनच तुझ्या देशाला विध्वंसकापासून संरक्षण मिळत आहे. तुझी अपूर्व भरभराट झाली आहे. तुला मिळालेल्या संधिचा उपयोग करून घेऊन तूं तुझे राज्य जगातील सर्वांत बलाढ्य राष्ट्र बनविले आहेस. परंतु दिवसेंदिवस तूं माझ्यापासून दूरदूर जात आहेस. ज्या आज्ञा मी तुझ्यावरील प्रेमामुळे तुझ्या रक्षणाकरिता दिल्या, त्या तूं जुमानत नाहीस. आपल्यामधील अंतर तूं फारच फार वाढवीत आहेस, व आता तुमच्या निसर्गात व तुम्हांत घातलेल्या शक्तिंवरील माझा ताबा सुटत चालला आहे. तुझ्या पापी वळणावरून मागे फिर अशी मी तुला विनवणी करतो. निदान आतापासून तरी तूं माझे आज्ञापालन करण्यास

तयार आहेस असें इस्राएली लोकांना जाऊं देण्याद्वारें व तुझ्या अस्तित्वाला लागू असलेले नियम पाळण्याद्वारें सक्रीय पद्धतिने दाखवून दे. ज्या भयंकर पीडा तूं तुझ्यावर व तुझ्या लोकांवर आणण्याच्या बेतात आहेस, त्यांच्याद्वारें तुझी मानहानी व सर्वनाश झालेला पाहायची माझी इच्छा नाही. परंतु जर तूं पश्चात्ताप करणार नाहीस, तर त्यामुळे माझी या शक्तिंवरील अगोदरच सैल झालेली पकड पूर्णपणे सुटेल. त्या माझ्या नियंत्रणातून मोकळ्या होतील, पण मग त्या भयंकर विनाशास कारणीभूत होतील. तरी लक्षांत ठेव कीं, तेव्हासुद्धा मी त्यांना माझ्या नियंत्रणाखाली आणू शकतो. ज्या क्षणीं त्या परत माझ्या नियंत्रणाखाली येतील, त्या क्षणापासून त्या मारक न राहता, उलट आशीर्वादाची साधने बनतील."

किती ममतेने व हृदयद्रावी भाषेत देवाने बंडखोर राजाच्या कठीण अंत:करणाला आर्जव केले. किती ताठरपणे व तुच्छतेने त्या सम्राटाने देवाच्या अबदल प्रेमाची आर्जवे लाथाडली. देवाला प्रत्युत्तर म्हणून त्याच्या साम्राज्यातील मांत्रिकांना बोलावून त्यांनी त्यांच्या काठ्या मोशेप्रमाणे खाली टाकून साप बनवावे असा हुकूम त्याने केला. दृष्य रूपात त्यासुद्धा साप झाल्याचे दिसले. एकाविरूद्ध एक अशी परिस्थिती न होता, एकाविरूद्ध अनेक अशी परिस्थिती उत्पन्न झाल्याचे दिसून आले. मोशेच्या सापाला फारोचे साप सहज खाऊन टाकतील असें भासत होते.

प्रत्युत्तरात राजा खरोखरीं काय सांगत होता बरें? तो जाहीर करीत होता कीं देवाने त्या शक्ति नियंत्रणाखाली ठेवण्याची त्याला काहीच गरज नव्हती. देवापासून विभक्त होऊनही तो स्वत:ची काळजी चांगल्या प्रकारें घेऊं शकत होता. नियंत्रणाचा राजदंड देवाला खुशाल सोडू देत. त्याचे विनाशाच्या सापात खुशाल रूपांतर होऊं देत. ज्या कोणत्या शक्ति देवाच्या नियंत्रणाखालून निघतील, त्या सर्वांना काबूत ठेवण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे होते.

अजूनही मानवाची वृत्ति अशीच आहे. जेव्हा तो संकटांनी घेरला जातो,

तेव्हा त्यावर मात करण्याकरिता तो स्वत:च्या शक्तिसामर्थ्याकडे वळतो. देवाचा विचार मनात आलाच, तर तो केवळ शेवटचा उपाय म्हणूनच येतो, आणि संकट सरल्याबरोबर त्याला देवाचे विस्मरण होते. परंतु देवाच्या नियंत्रणाखालून व मार्गदर्शनापासून हटलेल्या शक्तिंना काबूत आणण्याची कुंवत माणसात नाही. जेव्हा महासागरांवरून तुफानी झंझावाती वारे वाहतात, भूप्रदेश जलमय करतात आणि इमारती कोसळवितात, तेव्हा त्यांना थांबविण्याकरिता माणूस काहीसुद्धा करू शकत नाही. वारे त्यांचा पूर्ण क्रम संपवितातच. हीच गोष्ट भूकंपांची, ज्वालामुखींची, मोठमोठ्या आगींची व तत्सम गोष्टींची आहे. त्यांचा प्रतिकार करण्याकरिता किंवा त्यांना काबूत आणण्याकरिता माणूस काहीच करू शकत नाही. त्याचप्रमाणे फारोच्या सापांना मोशेचा साप पेलवला नाही. मोशेच्या सापाने फारोचे सर्व साप गटागट खाऊन टाकले, आणि तरी तो पहिल्याप्रमाणेच टवटवीत व चैतन्यपूर्ण राहिला.

या घटनेद्वारें देवाने राजाला जितक्या सुस्पष्टपणे आपला संदेश दिला, तितक्याच ठामपणे राजाने तो अमान्य केला.

दुसऱ्या दिवशीं ज्या क्षेत्रावरून देवाचे संरक्षण पहिल्याप्रथम काढून घेतले जाणार होते तें क्षेत्र मोशेने काठीने दर्शविले, म्हणजे देवाने भाकित केल्याप्रमाणे घडल्यानंतर ती गोष्ट योगायोगाने घडली असें राजाला म्हणता आले नसते.

पीडांचा उत्मात होत असतांना देवाने दयेचे दार वात्सल्याने व कळकळीने उघडेच ठेवले होते. इजिप्शियन लोकांना त्रस्त करणाऱ्या शक्तिंचा पुन्हां ताबा घेण्यास तो सर्ववेळ तयारच होता. परंतु केवळ त्यांच्या पश्चात्तापाद्वारेंच त्यांनी तें कार्य पुन्हां त्याच्या हातीं दिले, तरच तो तसें करू शकत होता. फारोला कबूल करावे लागले कीं त्याच्यामध्ये किंवा त्याच्या मांत्रिकांमध्ये विनाशाच्या शक्तिंना बांध घालण्याची ताकद नव्हती. तेव्हा तो देवाच्या सुस्वभावाचा गैरफायदा घेऊं लागला. जेव्हा त्याच्यावर संकटग्रस्त परिस्थितीचा भयंकर दबाव येत असे, तेव्हा फारो देवाला मोठमोठी वचने देऊन मोशेद्वारें देवाने पीडा दूर करावी म्हणून

देवाला गळ घाली. देव लगेच सापाला धरी, व तात्काळ त्याची पुन्हां काठी बने. संकट दूर झाले कीं फारोची आत्मप्रौढी जागृत होई व त्याने देवाला दिलेली सर्व वचने तो विसरून जाई.

मानव अजूनही तसाच आहे. मृत्युच्या जबड्यात सापडला असता पांचावर धारण बसून तो मुक्ततेसाठी देवाला वाटेल तीं वचने देतो. मग भयावह संकट दूर झाले कीं तो त्याच्या सर्व शपथा व नवस विसरून जातो व पुन्हां पहिल्याप्रमाणे दुष्टाईचे मार्ग अवलंबतो.

१८४६ सालांत अमेरिकेच्या मैन राज्यातील पोर्टलंड बंदरातून मॅसॅच्युसेट्स राज्यातील बोस्टन शहराकडे एक जहाज प्रवाशांना घेऊन चालले होते. अटलांटिक महासागरात एकाएकीं एक भयंकर वादळ उद्‌भवले व जहाजावरील लोकांच्या जीवाला मोठाच धोका उत्पन्न झाला. त्या दृष्याचे वर्णन एका उतारूने पुढील प्रकारें केले आहे:

"आम्ही फार धोक्यात होतो. लाटांच्या आदळण्यामुळे जहाज भीतिप्रद रित्या गटंगळ्या खाऊं लागले व लाटा केबिनींच्या (लहान खोल्या) खिडक्यांतून जोराने आंत येऊं लागल्या. स्त्रियांच्या केबिनमध्ये फारच घबराट झाली. बऱ्याच जणी देवाकडे पापांची क्षमा मागून त्याच्या दयेची याचना करू लागल्या. काही धन्य कुमारी मरीयेला संरक्षणासाठी आळवू लागल्या, तर दुसऱ्या काहींनी देवाला गंभीरपणे नवस केला कीं जर त्यांनी जमिनीवर परत पाऊल ठेवले, तर त्यांचे उरलेले आयुष्य त्या त्याच्या सेवेला वाहतील. तें दृष्य फारच घबराटीचे व गोंधळाचे होते . . . .

"देवकृपेने आम्ही सर्व सुखरूप किनाऱ्याला लागलो. परंतु वादळात भीति प्रदर्शित करणाऱ्या काही प्रवाशांनी किनारा गाठल्यावर एकतर त्यांच्या भीतिचा उल्लेखसुद्धा केला नाही, किंवा ती भीति हंसण्यावारीं घालविली. जीव वाचल्यास ईश्वरसेवेत आपले आयुष्य घालवू असें शपथेवारीं देवाला वचन दिलेल्या एका स्त्रीने जहाजातून उतरता उतरता उपहासात्मक आवाजात म्हटले:

“देवाची स्तुति असो, आले मी एकदाची पुन्हां भूमिवर!” मी तिला काही तासांपूर्वीचेच दृष्य व तिने देवाला दिलेली वचने आठवायला सांगितले, तेव्हा ती तोंड वेंगाडून चालती झाली.

“मृत्युशय्येवर पडल्यावर पश्चात्ताप करतात त्या लोकांची मला तीव्रतेने आठवण झाली. सबंध आयुष्यभर काही लोक केवळ स्वत:ची सोय बघतात व सैतानाची सेवा करण्यात आयुष्य घालवितात. मग आजार आल्यावर पुढे काय वाढून ठेवले आहे याची शाश्वति नसल्याने ते देवापुढे नमतात व त्यांच्या पापांकरिता काहीसें दु:ख व्यक्त करतात. मरण्याची आपली तयारी आहे असेंही ते कधीकधी म्हणतात. त्यांच्या हितचिंतकांना वाटते कीं त्यांचा खरेच पालट झाला आहे व त्यांना नक्कीच स्वर्गात प्रवेश मिळेल. परंतु जर ते बरे झाले, तर ते पूर्वी होते तसेंच बंडखोरीचे आयुष्य पुन्हां जगू लागतात.”

हीच गोष्ट इजिप्तच्या त्या बलाढ्य सम्राटाची होती. जेव्हा त्याच्यावर परिस्थितीचा दबाव होता तेव्हा तो पश्चात्ताप करीत आहे असें भासत होते, परंतु दबाव दूर झाल्याबरोबर त्याला बंडखोरीबद्दल खरे दु:ख झालेले नव्हते असें त्याच्या कृतिंद्वारें दिसून येई. प्रत्येक खेपेला असें वागल्यामुळे त्याच्या स्वत:च्याच मनावर व स्वभावावर वाईट परिणाम होत गेला व त्याचे हृदय अधिकाधिक कठीण होत जाऊन देवाला शरण जाण्याची त्याच्या मनाची पात्रता नष्ट होत गेली. अर्थात् त्यामुळे त्याच्या देशाभोवताली असलेल्या शक्ति देवाच्या नियंत्रणाखालून निघू लागल्या व परिणामीं नवनव्या पीडा देशावर येत गेल्या. सरतेशेवटीं दहाव्या पीडेनंतर सर्व प्रथमपुत्र मेले तेव्हा कोठे राजाचे हटवादी बंड पूर्णपणे चिरडले गेले, परंतु तोवर त्याचा देश पूर्णपणे उध्वस्त झाला व इस्राएली लोकांना गुलामगिरीत डांबून ठेवण्याचे सामर्थ्य त्याच्यामध्ये उरले नाही.

पण या पीडांपैकी एकही पीडा देवाने शासन म्हणून आपल्या हातांनी पाठविली नव्हती. उलट त्याच्या हातून शक्तिंचा ताबा सुटला तेव्हाच त्या पीडा

येऊं शकल्या व आल्या. शिकागोच्या गुंडांच्या पद्धतिंहून ही अगदीच उलट पद्धत आहे. जेव्हा विनाशाची हत्यारे त्यांच्या हातीं व त्यांच्या नियंत्रणाखाली असतात, तेव्हाच त्यांच्या कचाट्यात सापडलेल्या दुर्दैवी लोकांना वेदना व यातना भोगाव्या लागतात. उलट जेव्हा देवाच्या हातीं व नियंत्रणाखाली शक्ति असतात, तेव्हा त्या कधीही विध्वंसक बनू शकत नाहीत.

इजिप्तमध्ये देवाने नेमके काय केले त्याबाबतीत आज आपल्याला कितीतरी ज्ञानप्रकाश दिला गेला आहे, आणि तरी त्या घटनांच्या नोंदी वाचतांना लोक देवाच्या स्वभावासंबंधी किती चुकीचे निष्कर्ष काढतात याचे खरोखरीं नवल वाटते. काठी आणि साप यांच्या दाखल्याद्वारें देव इजिप्तच्या बाबतीत काय करणार होता, त्याचे बरोबर चित्रण देवाने काळजीपूर्वक दिले होते. देव खोटेपणा कधी करीत नाही. तो जें करणार असें त्याने म्हटले होते, अगदी तसेंच त्याने केले.

त्याने हेंही स्पष्ट केले आहे कीं माणूस अवलंबतो तसले मार्ग तो कधी अवलंबत नसतो. आपली उद्दिष्टे गाठण्याकरिता माणूस बळजबरीचा उपयोग करतो, परंतु देव कधीही बळजबरी करीत नाही.

जुन्या करारातील या सत्यकथनांना पुष्टि देण्याकरिता पित्याच्या स्वभावाचे आणि मार्गांचे स्वमुखाने व स्वतःच्या आयुष्याद्वारें चित्रण करण्यास प्रभू येशू आला होता. जसा फारो देवाशी वागला, अगदी तसेंच त्याचे छळवादी त्याच्याशी वागले होते, व जसा देव फारोशी वागला होता, अगदी तशीच प्रतिक्रिया येशूची त्याच्या छळवाद्यांच्या बाबतीत झाली होती. त्यांनी त्याची कुचेष्टा केली, उपहास केला, वेताचा मार दिला, त्याच्यावर थुंकले, त्याला क्रूर वधस्तंभ वाहायला लावला व शेवटीं त्यावर टांगले. परंतु तरीही त्याच्यामध्ये सूडबुद्धिचा लवलेशही नव्हता. त्याच्या हातीं असलेल्या निसर्गशक्तिंचा अस्त्र म्हणून वापर करून त्याला त्या दुष्टांना सहज नष्ट करता आले असते, परंतु त्याने तसें केले नाही. त्याची एकमात्र प्रतिक्रिया अपार ममतेची होती. त्याच्या

छळवाद्यांची अति कींव वाटून त्याच्या तोंडून ही प्रार्थना फुटली: “हे पित्या, या लोकांना क्षमा कर, कारण हे काय करीत आहेत, तें त्यांना समजत नाही.” लूक २३:३४.

## याअगोदर कां नाही

देवाने त्याच्या लोकांची सुटका करविण्याकरिता इजिप्तच्या लोकांना बळजबरी करून नमविले असा विचार मनात बाळगणे म्हणजे नकळत देवावर काही भयंकर आरोप करणे आहे. त्याने इस्राएली लोकांना शतकांनुशतके गुलामगिरीच्या यातनांमध्ये मुद्दाम, त्यांच्या क्लेशांकडे डोळेझाक करून, खितपत पडू दिले असा त्याचा अर्थ होतो, कारण कीं त्यांची सुटका झाली त्याअगोदर देवाला ती केव्हाच सहज करता आली असती.

जो सर्वसत्ताधारी आहे त्याला त्याच्या हेतुपूर्तिकरिता त्याचे सामर्थ्य पाहिजे तेव्हा वापरता येते. अनेकांना वाटते तशी जर देवाची पद्धत असती, तर इस्राएली लोकांच्या गुलामगिरीच्या प्रत्येक दिवसाची जबाबदारी त्याच्या माथीं पडली असती, कारण त्याने त्यांची सुटका करविली नाही. कैक शतके ज्या क्रूर गुलामगिरीत त्यांनी घालविली, त्या सर्व यातना व दु:ख देवाच्या हिशेबीं लागले असते, कारण कीं त्यांना मुक्त करण्याचे सामर्थ्य असूनही त्याने तें त्यांच्याकरिता वापरले नाही. जर देवाचे वागणे असें असते, तर तो प्रीतिरूप देव आहे असें म्हणणे चुकीचे होईल.

परंतु कोणत्याही समस्या बळजबरीच्या जोरावर सोडवायच्या नाहीत असें देवाच्या स्वभावाचे मूलभूत तत्व आहे. म्हणूनच इस्राएली लोकांच्या सुटकेची घटका देवाच्या वैयक्तिक विचारानुसार ठरणार नव्हती, तर इजिप्शियन लोकांच्या वाढत्या धर्मभ्रष्टतेच्या परिणामांवर अवलंबून होती. त्यांच्या अति

धर्मभ्रष्टतेमुळे ते देवापासून विभक्त झाले तेव्हाच विनाशकारी शक्तिंना वाव मिळून त्यांची गुलामांना बाळगण्याची पात्रता नष्ट झाली. तेव्हा, आणि तेव्हाच, इस्राएली लोकांना मुक्तता मिळू शकली. जेव्हा हीं तत्वे आपल्याला समजतात, तेव्हा इस्राएली लोकांना इतका प्रदीर्घकाळ गुलामगिरीत कां राहावे लागले याबाबत आपल्या मनात प्रश्न राहत नाही.

देव त्याच्या मार्गापासून कदापि ढळत नाही, कारण कीं बळजबरीने कोणतीही उद्दिष्टे खऱ्या अर्थी कधीही गाठली जात नसतात याची त्याला पूर्ण जाणीव आहे. जर बळजबरीने राज्य करावयाचे त्याचे तत्व असते, तर सुरूवातीलाच जेव्हा बंडाने डोके वर काढले, तेव्हाच त्याने त्याचा बिमोड करून त्याची नामोनिशाणी राहू दिली नसती. मग या जगात इतका दीर्घकाळ पाप राहिलेच नसते.

परंतु पापाला त्याचे पूर्ण स्वरूप उघड होण्याकरिता काळ मिळणे आवश्यक होते – सरतेशेवटीं तेंच स्वतःचा व त्याला धरून राहणारांचा नाश करते. तदनंतरच देव नवे आकाश व नवी पृथ्वी उत्पन्न करण्यास मोकळा होईल. त्या नव्या निर्मितीस पापाचा कलंक लागणार नाही.

## मंदिर शुद्ध करणे

प्रभू येशूच्या सेवाकार्याच्या अगदी सुरूवातीलाच त्याने मंदिरातून विक्रेत्यांनी भरविलेला बाजार उलथून टाकून मंदिर शुद्ध केले होते. ही गोष्ट *योहानकृत शुभवर्तमान* २:१३-२२ या शास्त्रवचनांत दिलेली आहे. मंदिराची कशी बाजारपेठ बनली होती हें पाहून तो अतिशय दुःखी झाला व त्याने "...दोऱ्यांचा एक चाबूक तयार केला आणि त्या साऱ्यांना मंदिराच्या आवारातून बाहेर घालविले; मेंढरे आणि गुरे यांनाही हाकून लावले आणि

सराफांचे चौरंग उलथेपालथे करून त्यांची नाणी जमिनीवर विखरून टाकली."
*वचन* १५वे.

ज्याप्रमाणे इजिप्तच्या पीडांसंबंधीच्या गोष्टीचा गैरअर्थ लावला जातो, तसेंच या घटनेबाबतसुद्धा सहज गैरसमज होऊं शकतो, व बहुतेक गैरसमजच आपल्याला सर्वत्र आढळतो. प्रभू येशूने चाबूक (कोरडा) हातात धरण्याचा अर्थ असा लावला जातो कीं तो त्या चाबकाद्वारें त्या लोकांना अक्षरश: धमकावीत होता, व जर त्यांनी त्याचे ऐकले नसते, तर त्याने नक्कीच त्या लोकांना बडविले असते.

जर त्याने तसें केले असते, तर त्याच्या वागणुकीत आणि गुंडांच्या पद्धतिंत काय फरक असता बरें? माणसाच्या मार्गांहून त्याचे मार्ग निराळे आहेत असें तो कसें म्हणू शकला असता बरें?

या प्रश्नांमुळे नक्की काय घडले हें पाहण्याकरिता त्या घटनेची फेरतपासणी करणे आवश्यक आहे. नव्या करारातील ही गोष्ट जुन्या करारातील आपण अभ्यासलेल्या गोष्टीचाच दुसरा नमुना आहे. देव फारोशी जसा वागला, तसाच प्रभू येशू विक्रेत्यांशी व सराफांशी वागला. देवाने विविध शक्ति हातीं धरून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासंबंधीचा हा दुसरा नाट्यमय धडा आहे. घटना-स्थिती व कृति किंचित निराळी आहे, परंतु संदेश तोच आहे.

महत्वाचा फरक एवढाच आहे कीं मोशेने काठी हातातून व त्याच्या नियंत्रणाखालून सोडून दिली, तर प्रभू येशूने हातातील कोरडा घट्ट धरून ठेवला, त्यावरील नियंत्रण सुटू दिले नाही.

मोशेच्या कृतिशी जुळणारी स्थिती मोशेच्या काळीं होती, तर प्रभू येशूच्या कृतिशी संलग्न असणारी स्थिती प्रभू येशूच्या काळीं होती. मोशेने काठीवरील ताबा सोडून देऊन दाखवून दिले होते त्याप्रमाणे इजिप्तला लागलीच पीडा भोगाव्या लागल्या होत्या. परंतु मंदिरात प्रभू येशूने त्यांना आश्वासन दिले कीं त्यांना पश्चात्तापाकरिता अद्यापि संधि व काळ होता कारण कीं तो अजूनही

हातातील चाबकावर नियंत्रण ठेवीत होता. म्हणूनच प्रभू येशूच्या पृथ्वीवरील वास्तव्याच्या काळात त्या लोकांवर कोठलीही भीषण संकटे आली नाही. ख्रिस्ताची कृति एक इषारासुद्धा होता कीं, जर ते लोक त्यांच्या दुष्टपणात टिकून राहिले तर प्रभू येशूचे चाबकावरील नियंत्रण जाईल अशी परिस्थिती नक्कीच येईल. तसें झाल्यास, जें इजिप्तच्या लोकांवर गुदरले, तें त्यांच्यावरही गुदरेल. त्यांनी पश्चात्ताप केला नाही हें इतिहासावरून आपल्याला माहीत आहे. इस्राएली लोकांनी देवाकडे पूर्णपणे व उद्दामपणे पाठ फिरविली व चाबूक साप बनला. हें इ.स. ७०मध्ये यरूशलेम शहर भीषण रक्तपात होऊन पूर्णपणे उध्वस्त झाले त्यावरून सिद्ध झाले आहे.

चाबकाने प्रभू येशू लोकांना मारील अशी शक्यताच नव्हती. दोऱ्यांचा कोरडा करण्यात त्याचा तो हेतु नव्हता. कोरडा लोकांवर धमकीरूपाने सज्ज होता, परंतु जोवर तो प्रभू येशूच्या हातीं होता तोवर लोक अगदी सुरक्षित होते. तो तिथेच राहावा हें यहुद्यांकरिता महत्वाचे होते, म्हणजे त्यांना इजा होऊं शकली नसती व त्यांचा नाशही झाला नसता. तेव्हा, जेव्हा आपण देवाच्या इजिप्तमधील कृतिशी प्रभू येशूच्या मंदिरातील कृतिची काळजीपूर्वक तुलना करतो, तेव्हा पिता जें काही करतो तेंच आपणही करतो व त्याच प्रकारें करतो असें जें कथन प्रभू येशूने केले होते तें सत्यकथनच आहे असें आपल्याला स्पष्टपणे आढळून येते.

## वधस्तंभाची साक्ष

प्रभू येशूच्या वधस्तंभाद्वारें देव, तसेंच सैतान, या दोहोंच्या कार्यपद्धतिंवरील पडदा सारला जातो. त्या वधस्तंभावर जो यज्ञ झाला, त्याशी संबंधित असलेल्या लढ्याचे स्वरूपच मुळीं तसें होते कीं देवाला, तसेंच सैतानाला, कार्याचा कळस

गाठेपर्यंत त्यांच्यात्यांच्या कार्याला पूर्णपणे वाहून घ्यावे लागले होते. एकालासुद्धा मागे, राखीव म्हणून, काहीच ठेवता आले नाही.

दोघांचेही स्वभाव विश्वापुढे उघड झाले. सैतानाने स्वतःचे खरे रूप लपविण्याकरिता पेहेरलेला खोटा मुखवटा फाडून टाकला गेला; विश्वापुढे देवाच्या नांवावर व स्वभावावर त्याने उडविलेले कलंकाचे शिंतोडे पुसून टाकले गेले. त्या प्रचंड व भयंकर झुंजीतून त्या दुष्टाचे खरे अंतरंग सर्वांपुढे उघडे झाले – कीं तो सर्वस्वी स्वार्थ पाहणारा विध्वंसक प्राणी होता, जो ज्याने त्याला घडविले होते व त्याला हरएक प्रकारें आशीर्वादित केले होते, त्याचासुद्धा स्वतःच्या स्वार्थासाठी प्राण घेण्यास कमी करीत नव्हता. त्याच्या पद्धति कशा असतात, त्या त्याने पृथ्वीवरील गुंडांच्या द्वारें नेहमीच उघड केलेल्या आहेत. जे कोणी त्याचे मानणार नाहीत, त्या सर्वांना तो कसें वागवील त्याचे उदाहरण त्याने प्रभू येशूला कशी वागणूक दिली त्यावरून आपल्याला मिळते.

देवाचा स्वभाव असा नाही याबद्दल आपल्याला अंतःकरणात कितीतरी खोलवर कृतज्ञता वाटली पाहिजे. जर देवाचा स्वभाव तसा असता, तर आपली भीतिने गाळण उडाली असती. देवपिता आणि प्रभू येशू यांचे तत्वच मुळीं अगदी निराळे आहे – तें आहे स्वार्थत्यागी, प्रीतिपूर्ण सेवेचे तत्व. त्यांना स्वतःला कितीही स्वार्थत्याग करावा लागला, तरी ते दुसऱ्यांचे हितच पाहतील व दुसऱ्यांची सेवा करतील. जे त्यांचे आज्ञापालन करीत नाहीत, त्यांची, ते दुसऱ्यांनी धडा घ्यावा म्हणून, धिंड काढीत नाहीत. उलट दुसऱ्यांना धडा मिळावा म्हणून ते स्वतःचे उदाहरण देतात, कीं लोकांचे जीव घेणे तर दूरच राहो, त्याऐवजी ते लोकांकरिता स्वतःच्या प्राणाचे बलिदान करतात.

प्रभू येशूचे वस्त्र खरोखरीं रक्तात माखलेले आहे – त्याच्या स्वतःच्या. सैतानाकडेसुद्धा रक्ताने माखलेले वस्त्र आहे – दुसऱ्यांच्या रक्ताने. या दोघांच्या पद्धति किती पूर्णपणे परस्परविरोधी आहेत. माणसांच्या आणि सैतानाच्या पद्धतिंची काळजीपूर्वक तुलना केली तर त्या अगदीच एकसारख्या असल्याचे

आढळून येते, परंतु तीं तत्वे व त्या पद्धति प्रभू येशूच्या जीवनचरित्रात किंवा त्याच्या पित्याच्या स्वभावात अजिबात आढळत नाहीत; आणि तरी त्या पद्धति अवलंबल्याचे खोटे आरोप त्यांच्यावर करण्यात येतात.

प्रभू येशू कशा प्रकारें मरण पावला यावरून देव कोठल्याही पातक्याचा नाश करीत नाही या सत्याचा फारच वजनदार पुरावा मिळतो. एदेन बागेत मानवाने स्वत:चे मार्ग निवडले. देवाने प्रीतिपूर्वक दिलेली जीवनरक्षक आज्ञा त्याने मोडली व आज्ञाभंगाच्या घातक परिणामांना वाव मिळेल अशी परिस्थिती उत्पन्न केली. ज्या दिवशीं त्याने तसें केले, त्याच दिवशीं, देवाने म्हटले त्याप्रमाणे, तो मेला असता; केवळ एका गोष्टीमुळे तो वाचला. ज्या क्षणाला मानवाने पाप केले, अगदी त्याच क्षणाला प्रभू येशू जीवनमरणाच्या रेषेवर उभा राहिला व म्हणाला: माझ्यावर पापाचे शासन पडू दे.

आपल्या वतीने व आपल्या पापाचे शासन भोगण्याकरिता म्हणून त्याने मानवावतार घेतला, नाहीतर आपणां प्रत्येकाला मृत्युने ग्रासले असते. हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. प्रभू येशू कोणतीही शिक्षा भोगायला आला नव्हता, तर फक्त ती शिक्षा जी मानवावर ओढवली होती, ती भोगायला आला होता. जर आपली शिक्षा अगदी पूर्णपणे भोगण्याच्या बाबतीत थोडी जरी कसर झाली असती, तर आपले तारण होऊं शकले नसते हें सांगणे नको. शिक्षा पूरेपूरपणे भोगली जाण्याचे अगत्य होते.

पापी मनुष्य पश्चात्ताप करून पापापासून फिरणार नाही तेव्हा त्याचा शेवट कसा होईल याबाबतीत दोन परस्परविरोधी कल्पना लोकांमध्ये आढळून येतात. बहुतेक लोक असें समजतात कीं शेवटीं देव पाप्यांना कंटाळून त्याचे दैवी सामर्थ्य वापरून भूतलावरून पातक्यांची नामोनिशाणी नष्ट करील. या शिकवणीत मृत्युदंडाची अंमलबजावणी स्वत: देव स्वत:च्या हातांनी करील असें समजले जाते.

जर ही शिकवण खरी असेल, तर आपला मृत्युदंड भोगण्याकरिता आलेल्या

प्रभू येशूचा मृत्यु त्याप्रकारेंच व्हावयास पाहिजे होता. जर आपले मरण देवाच्या हातून व्हावयाचे असेल, तर पित्याने आपल्या हाताने पुत्रावर आघात करावयास पाहिजे होता.

दुसरी शिकवण अशी आहे कीं पातकी मनुष्य देवापासून स्वतःला विभक्त करतो. परिणामीं देवाने निसर्गात व पाप्याच्या मानवी शरीरात घातलेल्या शक्तिंवर देवाचे पाहिजे तसें नियंत्रण राहू शकत नाही व म्हणून पातक्याचा त्याच्या स्वतःच्या पापीपणामुळेच सर्वनाश होतो.

जर ही शिकवण खरी असेल, तर प्रभू येशूने अशा प्रकारें मरण्याचे अगत्य होते.

यावरून स्पष्ट पुरावा मिळतो कीं ज्या प्रकारें प्रभू येशूचा मृत्यु झाला, त्याच प्रकारें बंडखोर, हटवादी पाप्यांचा होईल. सुदैवाने प्रभू येशूच्या मृत्युच्या बाबतीत गूढ असें काहीच नाही. सर्व लोकांच्या देखत तो मृत्यु घडून आला. त्यावेळीं पिता स्वर्गातून वधस्तंभाकडे आला व आपल्या हाताने त्याने त्याच्या एकुलत्या एका प्रिय पुत्रावर वार करून त्याचा प्राण घेतला असें मानणारा एकही माणूस मला आजवर भेटलेला नाही. प्रभू येशूचा मृत्यु त्याप्रकारें घडला नाही.

काय घडले त्याची साक्ष आपल्याला खुद्द प्रभू येशूच्याच तोंडून मिळते. त्याच्या शेवटल्या काही क्षणांत त्याच्या तोंडून हृदयद्रावक स्वरात उद्‌गार बाहेर पडले: “माझ्या देवा, माझ्या देवा, तूं माझा त्याग कां केलास?” *मत्तय* २७:४६. देव आपल्या हातात बळी घेण्याची हत्यारे घेऊन वधस्तंभाकडे येत होता अशी साक्ष या वाणीतून मिळत नाही! उलट तो ख्रिस्तापासून दूर होत होता, जसा तो प्रत्येक अपश्चात्तापी पातक्यापासून दूर होतो. प्रभू येशू स्वतः पातकी नव्हता, परंतु सबंध जगाच्या पापांची जबाबदारी त्याने उचलल्यामुळे प्रत्येक पातक्याची जागा त्याने घेतली होती. तीं पापे त्याने इतक्या पूर्णपणे स्वतःवर घेतली होती कीं जणू तें प्रत्येक पाप त्याने स्वतःच केले होते. पातकांच्या भयंकर भारामुळे तो त्याच्या पित्यापासून दुरावला जात होता. देवापासून पूर्णपणे विभक्त

झाल्यामुळे व पापाच्या नाशवंत सत्तेच्या अधीन आल्यामुळे प्रभू येशूचा मृत्यु पापाने घडवून आणला होता.

अगदी त्याच प्रकारें इजिप्तचे लोक, सदोमचे रहिवासी, जलप्रलयापूर्वीचे जग, आणि ज्या कोणाला मृत्युदंड भरावा लागलेला आहे तो प्रत्येकजण मरण पावला आहे. भविष्यवचनांत सांगितलेल्या एक हजार वर्षांच्या काळाच्या शेवटीं, ज्या कोणी पापाच्या सत्तेपासून मुक्तता मिळविण्यास नकार दिलेला असेल, त्या सर्वांचा बळी पाप घेईल व त्यांचे नामोनिशाण नष्ट करील.

## अधिक उच्च, अधिक पवित्र विचार

देव प्रीति आहे. त्याचा स्वभाव, त्याच्या आज्ञा, प्रीति आहेत. सृष्टिनिर्मितीतील प्रत्येक कृति, प्रत्येक योजना, उद्धारकार्यात घेतलेले प्रत्येक पाऊल त्या अगम्य प्रीतिचे प्रगटीकरण आहे. देवाच्या नसानसात, स्वभावाच्या प्रत्येक पैलूत, ती प्रीति भिनली आहे व तीच त्याच्या वागणुकीतून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या उघड होते. देवाचे मार्ग न बदलणारे आहेत. त्याची तत्वे खंबीर व टिकून राहणारी आहेत. तीं आपल्या मनांत जितक्या चांगल्या प्रकारें ठसतील व आपल्याला समजतील, तितके आपल्याला त्यांचे मोल अधिकाधिक वाटू लागेल. ती प्रीति समजून घेतल्यास व स्वीकारल्यास मानवी जीवात्मा तिच्या प्रकाशाने व माधुर्याने भारून जाईल. चिरकालीन देवाला संतोषवितील असें विचार आपल्या मनांत उत्पन्न होऊं लागतील. सर्वशक्तिमान देवाच्या राजासनापासून जीवनाचे व माधुर्याचे जें गौरवी प्रवाह नित्य वाहतात त्यांत डुंबण्याचे भाग्य आपल्याला लाभेल, व आपल्याद्वारें ते प्रवाह दुसऱ्यांपर्यंत पोहंचतील, व त्यांच्यातर्फे आणखी इतरांपर्यंत पोहंचतील. उद्धार पावलेले जन किती अचंब्याने व हर्षाने त्यांच्या प्रभूच्या आनंदाचे वाटेकरी होतील.

चिरकालीन देवाच्या मुखप्रकाशात राहण्याच्या भाग्याइतके दुसरे सुख नाही; या आनंदाची बरोबरी दुसऱ्या कशानेही होऊं शकत नाही.

प्रभू येशूच्या द्वितीय आगमनापूर्वी व सार्वकालिक हर्षाच्या त्याच्या आशीर्वादित साम्राज्याची स्थापना होण्यापूर्वी हें भाग्य आपले होऊं शकत नाही असें कोणी समजू नये. देवाच्या खऱ्या देवभक्ताकरिता स्वर्गाची सुरूवात इथे या आयुष्यातच झाली आहे. त्याच्या हृदयात देवाची प्रीति राहते व त्याच्या आयुष्यातून देवाचा स्वभाव प्रगट होतो. दिवसेंदिवस तो देवाविषयीं ख्रिस्ताप्रमाणे विचार करण्यास व बोलण्यास शिकतो. ख्रिस्तालाच देवाची सर्वांत जास्त ओळख होती व त्यानेच देवाविषयींचे सर्वोत्कृष्ट विचार प्रगट केले आहेत या सत्याचा तो स्वत:ला विसर पडू देत नाही.

मानवांचे पतन झाल्यापासून मानवी मनांत त्यांच्या प्रेमळ स्वर्गीय पित्याच्या स्वभावाविषयीं कितीतरी चुकीचे समज निर्माण झालेले आहेत ही एक अतिशय खेदाची गोष्ट आहे. मोजमाप करता येणार नाही इतके घोर दुष्परिणाम त्यामुळे होत आहेत. भूतलावरील मानव-कुटुंबावर जे असंख्य क्लेश, दु:ख व यातना ओढवलेल्या आहेत व ओढवत आहेत, त्या सर्वांचे मूळ कारण हा देवाच्या स्वभावाविषयींचा गैरसमज आहे. पालकांच्या वागणुकीचे अनुकरण करणे ही मुलांची प्रवृत्तिच असते. त्यानुसार जेव्हा, चुकीने कां होईना परंतु, देव बळजबरीने आज्ञापालन करायला लावतो असें माणसे समजतात, तेव्हा ते त्याचे अनुकरण करून त्यांच्या इतर मानवबांधवांवर बळजबरी करू लागतात.

अर्थातच अशा प्रकारें उद्‌भवलेले दबाव दूर करण्याकरिता बळजबरी झालेली माणसे प्रतिकार करू लागतात. अटळ परिणाम लढाया, गुंडगिरी, खून व इतर हजारों दुष्कृत्यांमध्ये दिसून येतात. आपल्याच जीवनाचे व मालमत्तेचे रक्षण करायचे असें उद्दिष्ट असलेले लोक त्यांच्या महत्वाकांक्षा गाठण्याकरिता दुसऱ्यांना कितीही किंमत भरावी लागली तरी पर्वा करीत नाहीत.

परंतु जर त्यांनी माणसाप्रमाणे विचार करण्याचे सोडले, व त्याऐवजी देवाचा

खरा स्वभाव समजून घेतला, तर त्यांना देवाचे अनुकरण करण्याची स्फूर्ति प्राप्त होईल. मग त्यांचे जीवनातील मुख्य उद्दिष्ट स्वत:चा स्वार्थ पाहण्याचे राहणार नाही, तर स्वत:ला कितीही किंमत द्यावी लागली तरी दुसऱ्यांचेच हित करण्याची त्यांची वृत्ति राहील. जशी प्रभू येशूची वृत्ति नेहमी अशी होती, तशी जर ती प्रत्येक व्यक्तिची होईल, तर जगात एकही युद्ध, खून, छळ व तत्सम गोष्टी घडणार नाहीत.

मानवाप्रमाणे नव्हे, तर प्रभू येशूप्रमाणे देवाविषयीं विचार करण्यास शिकण्याचा काळ आलेला आहे. पित्याचा स्वभाव खरोखरीं कसा आहे हें त्याने आपल्याला दाखवून दिले आहे. जेव्हा प्रभू येशूने आपल्याला उपलब्ध करून दिलेले देवाचे स्वभावचित्रण आपल्याला खरोखरीं दिसेल व त्याचे मोल वाटेल, तेव्हा ज्या कोणाचे हें भाग्य असेल त्यांना तारणाचे व उद्धाराचे अमोल खजिने प्राप्त होतील. त्या सर्वांची हृदये आनंदित होतील, कारण कीं :

“सार्वकालिक जीवन हेंच आहे कीं,
तूं जो एकच खरा देव आहे, त्या तुला,
व ज्याला तूं पाठविले, त्या येशू ख्रिस्ताला
त्यांनी ओळखावे.”
*योहान* १७:३.

या व इतर सत्यांच्या आणखी अभ्यासाकरिता आपण कृपया पुढील पुस्तके वाचावी:

गुलामगिरीतून स्वातंत्र्यात

जिवंत आणि मेलेले

हीं व आणखी अनेक पुस्तके इंग्लिश भाषेतून व जगाच्या इतर कैक भाषांतून उपलब्ध आहेत.